


" एक पाप विरहित मनुष्य जी इतरांसाठी व आपल्या शत्रुंच्या पापांसाठी प्रायश्चित म्हणुन स्वत: चे बलिदान देतो म्हणूनच त्यांना जगाचा उद्धारकर्ता म्हणून ओळखले जाते, हे एक खुप मोठे समर्पण आहे, म्हणून प्रभु यीशु ख्रिस्ताचा जन्म प्रत्येकाच्या अंतकरणात झाला पाहिजे, तो एक अहिंसेचे सर्वश्रेष्ठ प्रतिक आहे."

– राष्ट्रपिता महात्मा गांधी

Source:
1) Gandhi, Christ and Christianity, P. No. 1, Author : Pascal Alan Nazareth
2) My encounter with truth, P. No. 88, Author : Mahatma Gandhi

"मी एक पौरात्य मानुस म्हणून नासोरी येशु ख्रिस्ताची आराधना करायची झाली तर, माझ्यासाठी एकमेव मार्ग आहे त्यास परमेश्वर मानुन आराधना केली पाहिजे, जर मी नासोरी येशुच्या काळात जगलो आसतो तर त्याचे पाय माझ्या डोळ्यातील अश्रुंने नव्हे तर माझ्या ह्रदयातील रक्ताने धुतले असते."

– विश्व मानव स्वामी विवेकानंद



Source:
1) The Complete works of Swamy Vivekananda, Vol-4, P. No. 143, Author : Swamy Vivekananda
2) The Master as I Saw Him, P. No. 233, Author : Sister Nivedita



"येशु ख्रिस्त जेंव्हो वधस्तंभावर होते जेंव्हा त्यानी स्वत:ला वाचवले नाही त्यांचा जन्म स्वत:ला वाचवण्यासाठी नाही तर पुर्ण जगाला वाचवण्यासाठी झाला होता, माझ्या बुद्धी प्रमाणे मी जितकी माहिती घेवू शकतो तितके शोधले तर गुरू मानण्यसाठी एकच व्यक्ती योग्य वाटतो तो दुसरा कोणी नाही तो फक्त येशु ख्रिस्त आहे."

– माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

Source:
1) A Series of Vasan's life history, P. No. 15, Author : G. T. Ashwathnarayan
2) To the Unknown God, Chapter 20, P. No. 161, Author : Vicki Harley Holland

"ह्या जगात दोन शक्त्या आहेत त्या म्हणजे तलवार आणि प्रिती होय, प्रिती ही तलवारी च्या शक्तीस हारवते, उद:- अलेक्सझांडर सिजर आणि चालेमानी ह्यांनी आपल्या तलवारी च्या जोरावर आपले राज्य स्थापन केले परंतु ते आज पाहण्यात येत नाही, परंतु येशु ख्रिस्ताने आपल्या प्रेमाच्या सहाय्याने जे राज्य स्थापन केले आहे ते आजही खंबीर आहे त्यासाठी हजारो लोक आपले प्राण ही देण्यासाठी तयार आहेत."

– महान सम्राट नेपोलियन बोनापाट्रे



Source:
The message of Upanishad, P. No. 529, Author : Shri Swami Ranganathananda

**Grace Bretheren Assembly**
Paper Town, Bhadravathi – 577 302,
Shivamogga Dist. Karnataka State, India.

# सत्यमेव जयते

(Marathi)

## TRUTH ALONE TRIUMPHS



**S. Giri**

# सत्यमेव जयते

# SATHYAMEVA JAYATHE

(Marathi)

**S. Giri,** **D C Sc & E, S A S**

**SATHYAMEVA JAYATHE**
Post Box No: 87, Shivamogga - 577201
Karnataka State, INDIA
E-Mail : satyamevjayate.life@gmail.com
Web site : satyamevjayate.life
Mob : 9845417088

**Publisher:**
**Grace Brethren Assembly**
Paper Town, Bhadravathi - 577 302,
Shivamogga Dist, Karnataka, INDIA



**Sathyameva Jayathe –** Written by S. Giri based on Spiritual Contents collected from Various Religious Books and opinion expressed from our leaders.

First Print : August 2023

Pages : 72

Offering : Rs. 25/- (For Private Circulation only)

**Translated By:**
**Pr**. Vinod Mallappa Shivanur.
Mob: 8975242933

**Publisher:**
**Grace Brethren Assembly**
Paper Town, Bhadravathi - 577 302,
Shivamogga Dist, Karnataka, INDIA

**Most Rev. Dr Francis Serao S. J**
Bishop of Shimoga

Bishop's House
Malligenahalli, Sagara Road
Shivamogga – 577205.
Cell No. +91 94483 55813
Email : bpfrancisserraosj@gmail.com

## अभिमानाने अशीर्वादपुर्वक दोन शब्द

ख्रिस्त भक्त भाऊ एस, गिरी, यांनी प्रभू येशू ख्रीस्तास आपला तारणारा म्हणून स्वीकार केले आहेत. प्रभू येशू ख्रिस्ताचा परिचय करून देणारे हे पुस्तक अगोदरच 15 भारतीय भाषेमध्ये भाषांतरित झाले आहे, आणि भारताच्या काना कोपऱ्यामध्ये येशू ख्रिस्तांची खरी ओळख करून देत आहे. त्यांचं परिश्रम व उत्साह कौतुकास्पद आहे.

ह्या लहान पुस्तकामध्ये 20 अध्याये आहेत. लेखकाने भारताची नागरिकता आणि सनातन वेदामध्ये लपलेला ख्रिस्त आणि त्याचे उपदेश ह्याना धैर्याने प्रकट केले आहेत. मारिया आणि येशू ख्रीस्ताबद्दलचे पवित्र कुराणामधील उतारे इथे पहावयास मिळतात. महात्मा गांधीजी, मदर तेरेसा ह्यांनी ख्रीस्तातील सत्य आणि प्रेरणा मिळवून श्रेष्ठ जीवन जगले आहेत. तसेच आपणही ख्रीस्तासाठी साक्षी होणे गरजेचे आहे. ख्रीस्तामधील दैवी गुणस्वभावाना आमच्या जीवनामध्ये आणून एक आदर्श जीवन जगावे अशी लेखकांची इच्छा आहे.

आम्ही सर्वजण अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करावे, स्वर्ग आणि पृथ्वीचा प्रकाश म्हणजे ख्रिस्त. त्याच्या प्रकाशात चालणारे आम्ही धन्य आहोत. अंधारात असलेल्यांना प्रकाशात आणणे हे आमचे कर्तव्य आहे. दोन हजार वर्षापूर्वी ख्रिस्ताने अनेकाना ताऱ्याप्रमाणे, सूर्याप्रमाणे प्रकाश दिला आहे. तो आता सुद्धा अनेकांच्या जीवनात झळकत आहे. हा संदेश ह्या पुस्तकामध्ये आहे. पवित्र आत्मा माझ्यामध्ये आहे गरीबाना सुवार्ता, संकटातील लोकाना सुटका, बंधनात असणाऱ्याना मुक्ती, आजारी लोकाना आरोग्य, आणि स्वर्गाचे राज्य सत्याचे राज्य नीती न्यायाचे राज्य हे आहे. हे प्रत्येकाला समान सन्मान, आदर देणारे राज्य आहे. असल्या प्रकारचे राज्य आपल्या



ठिकाणी प्रारंभ करण्यासाठी प्रभू येशू ख्रिस्त आम्हा सर्वाना बोलावीत आहे. हे आमंत्रण ह्या पुस्तकात स्पष्टपणे व्यक्त होत आहे.

ख्रिस्त भक्त एस, गिरी, भावासारख्या लोकानी आमच्यासाठी हल्लीच्या दिवसामध्ये प्रकट केलेल्या देवाची आम्ही स्तुती करतो. आशा व्यक्तीमुळे प्रभु येशू ख्रिस्तांचे परिचय अजून अनेकाना व्हावा आणि प्रत्येकाना स्वर्गातून आलेली, जीवन देणारी भाकरीसोबत जगण्याचे भाग्य आणि आशीर्वाद सर्वाना लाभावे अशी आमची प्रार्थना आहेत.

ख्रिस्तामध्ये तुमचा

महा सन्माननीय फ्रांसिस सेरावो एस, जे प्रांत धर्मगुरू,
शिवमोग्गा

## अग्रलेख

श्री. एस. गिरी. हे एक सत्यशोधक आहेत. त्यांनी अनेक ग्रंथांचा, पुस्तकांचा, अभ्यास व संशोधन केले आहेत, अनेक महान व्यक्तींचे विधाने बारकाईने निरीक्षण केले आहेत, व प्रभू येशू ख्रिस्तांचे जीवन व सेवा हेही अभ्यास केले आहेत. दैवी सत्य अगदी सामान्य माणसाना सुद्धा समजावे व सापडावे म्हणून, साध्या सोप्या भाषेत "सत्यमेव जयते" हि पुस्तिका लिहण्याचे काम हाती घेतले. ह्याच्यामुळे खऱ्या मनाने सत्य शोधणाऱ्या माणसाला, सत्य सापडण्यासाठी नक्कीच मदत होणार आहे. माणसांचे सार्वकालिक प्रश्ने, जसे मी कोण आहे? मी इथे कशासाठी आलो आहे? मी कोठे जाणार आहे? जीवनाचे उद्देश काय? ह्यांचे उत्तरे देण्याच प्रयत्न लेखकाने ह्या पुस्तकात केले आहे. मरणानंतरचे जीवन दुसरे काही नसून सार्वाकालीकतेचे प्रारंभ आहे. आणि एखाद्याने त्या भविष्याला सामोरे जाण्यासाठी कसे तयार राहावे ह्याचे हितगुज ह्या पुस्तकात केले आहे. अनेक लोक आपल्या जीवनाबद्दल गोंधळून गेले आहेत. ते शांती आणि समाधान ह्यांना शोधता शोधता न मिळाल्यामुळे, जीवानात बेचैन

झाले असून, अपराधी मनोभावनेने भरले आहेत. ह्या बद्दल अनेक गुरु महागुरुनी आपापले मते प्रसार व प्रसिद्धी करत असतात. पण अधिकृत आणि सर्वांनि स्वीकारण्या योग्य उत्तर हा गाभा अनुत्तरीतच राहते. आमचे जीवन मौल्यवान आहे पण ते शिघ्रपणे निघूनही जाते. ह्या पृथ्वीवर घेतलेले निर्णय आमच्या सार्वाकालीकतेवर परिणाम करतात. हे गांभीर्य मनात घेवून, भाऊ एस, गिरी ह्यांनी, 'मानवी जीवनाचे अंतिम लक्ष्य' ह्या बद्दलचे अनेक वस्तूस्थितीस प्रकाशात आणले आहेत. उदा. स्वर्ग व नरक, आणि स्वर्गामध्ये कसे जावे इत्यादी. ह्या पुस्तकामुळे उघड व स्वच्छ मनाचा वाचक खात्रीने सत्य प्राप्ती करवून, त्याचे आशीर्वाद अनुभवणार आहोत यात शंका नाही.

मुळात हे पुस्तक कन्नड भाषेत लिहिले आहे. ह्या पुस्तकाची प्रसिद्धी जसजशी वाढत आहे तसतसे याचे अनुवाद इंग्रजीमध्ये आणि अनेक भारतीय प्रमुख प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतरित झाले आहेत. शास्त्रातील श्लोकांचा व इतर ग्रंथातील उताऱ्याचे अर्थ समजण्यासाठी त्यांचा भावार्थ वापरलेला आहे. हे पुस्तक आपण विश्वास ठेवून वाचत असता आणि समजत असता आपणास महान आशीर्वाद नक्कीच भेटेल.

**प्रभुदास, टी. एस.**
**निवृत्त मॅनेजर (HRD) MPM भद्रावती**

**लेखकाकडून काही शब्द:** आपण जे प्रत्येक बाबतीत तपासतो आणि निर्णय घेतो ते केवळ देवाच्या बाबतीत तपासण्यास घाबरत असतो आणि आपण आपल्या इच्छेप्रमाणे आचरण करून देवाला संतुष्ट करू शकत नाही. त्यामुळे मी सखोल अभ्यास करून सत्याच्या शोधात सापडलेल्या तथ्यांची माहिती माझ्या मित्रांना देणे हे माझे कर्तव्य आहे. म्हणून मी ते पुस्तकरूपात आणले आहे.

कोणताही पूर्वग्रह, पक्षपात, वैयक्तिक स्वार्थ न ठेवता देशाच्या घटनात्मक तरतुदींमध्ये हे पुस्तक तुमच्यापर्यंत पोहोचले आहे. शेवटी सत्याचाच विजय होतो. हे सत्य सर्वांपर्यंत पोहोचावे हीच माझी इच्छा आहे. त्यामुळे या पुस्तकाचे नाव 'सत्यमेव जयते'.

अनेकांच्या विनंतीनुसार या पुस्तकाचे देशातील 15 प्रमुख भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले आहे. त्याचा लाभ घ्यावा ही विनंती.

-**एस. गिरी.**



## अनुक्रमणिका

1) भारताचे नागरिकत्व ....07
2) मनुष्याचा आत्मा....09
3) मुक्तीचा (मोक्षाचा) मार्ग....11
4) क्षमा / दया....14
5) सनातन वेदामधील प्रजापती आणि पशु (यज्ञाचा) बळीचा विधी....16
6) येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान आणि स्वर्गारोहण....20
7) प्रभू येशू ख्रिस्त परत येणार आहे ....21
8) पापा पासून सुटका कोणाकडून?....23
9) येशू ख्रिस्ताचे म्हणणे आम्ही का बरे मानावे?....24
10) पवित्र शास्त्राचे चरित्र (बायबल इतिहास)....27
11) सुखभोगी श्रीमंत माणूस आणि भिकारी याचा दृष्टांत....29
12) येशू ख्रिस्त कोण? या विषयावर तुमचा निर्णय....30

**वेग वेगळ्या पत्रीकामध्ये प्रकाशित झालेले लेख**

13) येशू देव हा पवित्र देव आहे....31
14) येशू ख्रिस्तांच्या डोंगरावरील प्रवचनाचा सारांश....34
15) येशू ख्रीस्तानी केलेले 37 चमत्कार....38
16) व्यभिचारामध्ये सापडलेल्या एका स्त्रीचा न्याय करण्यासाठी तिला येशू समोर सादर केले असताना....45
17) मरणा नंतर काय? या प्रश्नाला पवित्र शास्त्रामध्ये स्पष्ट उत्तर आहे....49
18) येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर उच्चारलेले 7 उद्गार....53
19) प्रभू येशू ख्रिस्तांच्या शिक्षणाची घोषणा सर्व जगभर करण्यात आली आहे....55
20) दैवी ज्ञान....67

## 1. भारताचे नागरिकत्व.

हिंदू धर्म हा जगातील अती प्राचीन धर्मांपैकी एक आणि जगातील तीसऱ्या क्रमांकावरील मोठा धर्म आहे. भारताचे मुळ नागरिक हे द्रविड होते, ते सिंधू नदीच्या कडेवर राहत असल्यामुळे त्यांना सिंधू लोक हे नाव पडले नंतर कालांतराने त्याचा अपभ्रंश होवून '*हिंदू*' हा शब्द रूढ झाला. खिर्स्त पूर्व 6000 वर्षापुर्वी मध्य आशियामधील आर्य लोक आमच्या भारतात राहण्यास आले. हे लोक राज्य मिळवून स्थापित झाल्यानंतर, सृष्टीच्या निर्माणकर्त्या परमेश्वराची उपासना करण्यास प्रारंभ केले. तेव्हा त्या आर्य ऋषी मुनींना काही सत्य समजले. ते हे कि परमेश्वर पवित्र आहे. मानव स्वाभाविकपणे अपवित्र असतो. म्हणून प्रथम ह्या मानवाच्या पापाला प्रायश्चित्त मिळाल्याशिवाय ह्या मानवाचा देवासंगे मिलन होणार नाही. ह्या गोष्टी त्यांनी जाणले. मग आता ह्या पापांचे परिहार व प्रायश्चित्त होणार कसे? ह्यावर विचार करता करता ते लोक संध्यावंदनच्या वेळी त्यांनी करत असलेली एक प्रार्थना ऋग्वेदातील देवतार्चन हं विधी पान.

(न. 62 मध्ये असा उल्लेख झाला आहे ते हे!)

***पापोऽहं पापकर्माहं पापात्मा पापसम्भवः।***

***त्राहि मां कृपया देव शरणागत वत्सल।***

***अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम॥***

***तस्मात्त कारुण्य भावेन रक्ष रक्ष जनार्दन॥***

***आ...नमः। प्रदक्षिण नमस्कारन समर्पयामि॥***

**ह्या श्लोकाचा अर्थ:** "मी जो पापी, पापे केले आहे. मी पापात्मा असल्यामुळे पापे घडले आहेत. शरण येणाऱ्याना क्षमा करणाऱ्या देवा, कृपा करून माझे तारण कर. देवा तुला शरण आल्याशिवाय मला आता दुसरा पर्याय नाही. म्हणून देवा मी तुला वंदन करितो आणि तुझ्या कृपानुभावाने माझे तारण कर, प्रदक्षिणा व नमस्कारे मी तुला अर्पण कारितो."



कोणी नीतिमान नाही एकही नाही. सर्वांनी पाप करून देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत. आमच्या मध्यें पाप नाही असे म्हणत असलो तर आम्ही स्वतःलाच फसवत आहोत. ह्या पापापासून सुटका मिळवण्यासाठी पुण्य कर्मांनी, सत्कार्मांनी, दान धर्मानी, पूजा-पाठानी साध्य होणार नाही. कारण कोणी नियामांचे पालन करून देवाच्या सानिध्यात नीतिमान असा निर्णय मिळवू शकत नाही. अनेक काळापासून पापामध्ये बुडलेल्या आम्हाला ह्या पापापासून मुक्ती प्राप्त होणार काय? आम्ही सर्व अशुद्ध आहोत. आमचे सत्कर्मे देवासमोर घाणेरड्या कपड्यासारखे आहेत. असा दावा पवित्र शास्त्र (बायबल) करते.

## ह्या बद्दल प्ुरंदर दास असे सांगतात

कडुलिंब गुळात ठेविलेस काय फायदा.  
नागाला दूध पाजिलेस काय फायदा?  
कुटीलतेने वागणाऱ्या माणसाने केलेल्या मंत्रांचा काय फायदा?  
कपटीपणाने इतरांना त्रास देणारे जप केल्यास काय फायदा?  
रागवणारा माणूस निरंतर केलेला उपवासाचे काय फायदा?  
आई-वडिलांना त्रास देणारा केलेले तिर्थ प्रवासाचे काय फायदा?  
विश्वास घात करणारा निरंतर गीता पठण केल्यास काय फायदा?  
पतींच्या निंदा करणारे पत्नी विविध नवस केल्यास काय फायदा?  
पाहुण्यां - पाहुण्यांमध्ये मध्य फरक करणाऱ्या माणसांनी  
विकासाची अपेक्षा केल्यास काय फायदा?  
कनिष्ठ दर्जेचे गुणांना न सोडीता  
गंगेत केलेल्या आंघोळीचा काय फायदा?

## 2. मनुष्याचा आत्मा.

देवाने सर्व प्राणी व पक्षी यांना आपल्या तोंडच्या शब्दाने (फक्त बोलण्याने) प्राण आणि शरीर असे त्यांना निर्माण केले. ते मेल्यावर विरून जातात. काहीही राहत नाही. पण मानवांना निर्माण करत असताना देवाने त्यांना स्वतःच्या स्वरूपात, मातीतून घडविला व त्याच्या नाकपुड्यात श्वास फुंकिला, तेव्हा मनुष्य जीवात्मा असे झाला. अशा प्रकारे मनुष्य निर्माण करताना शरीर, प्राण व आत्मा असे त्याला बनविले. मनुष्य शरीरामध्ये वस्ती करतो त्याला आत्मा व जीव आहे.

ह्या जागातील मानवांचा जन्म तात्पुरात्या काळासाठी असतो. एक दिवस खचितच त्याला हे जग सोडावे लागणार आहे. ह्या जगामध्ये जन्म घेतलेले माणसे किती थोर, पराक्रमी, श्रीमंत, ज्ञानी आणि चांगले असो पण मरण म्हणता क्षणी एक प्रकारे भय व चिंता त्याला पीडतात. कारण आम्ही जगात येताना काही घेवून आलो नाही व जाताना काही घेवून जावू शकत नाही कमावलेले सर्व इतरांना देवून जावे किंवा सोडून जावे लागते, मानवाला आजार, अपघात, नैसर्गिक आपत्ती आणि इतर कारणामुळे मरण येतो. आणि ते कधी कुठे आणि कोणाला येईल ते कळत नाही. ह्या मरणापासून कोणालाही सुटका नाही कारण हे देवाने नियमित आहे.

मरण हे शरीरासाठी आहे पण आत्म्याला नाही. आत्म्याचा जन्म एकदाच होतो मग देह विसर्जन केल्यानंतर स्वर्ग किंवा नरक ह्या मध्ये जावून सर्वदा तिथेच राहावे लागते. ह्या दोन ठिकाणांना सोडून आत्म्याला जाण्यासाठी तिसरे कोणतेही ठिकाण नाही.

### नरक

आमचा आत्मा नरकाला जाण्यासाठी आम्ही काहीही करण्याचे गरज नाही. ते मोफतपणे आम्हाला स्वागत करण्यासाठी तयार आहे. पण काही जनांच्या मते तिथे व्यभिचार, पिणे, अश्लील नृत्य असे इतर पापाचे कामे करून आनंद उपभोगण्याचे ठिकाण नाही. ते एक भयंकर पिढादायक ठिकाण आहे. ते अग्नी व गंधक ह्याने भरलेली आहे. अलीकडे वैज्ञानिकानी सुद्धा ह्या गोष्टीला दुजोरा देत आहेत.



**ह्या नरकाबद्दल पवित्र कुराण मध्ये असे सांगितले**

**22 अल हुज्ज**

त्यांच्या डोक्यावर उखळणारे पाणी ओतण्यात येईल. त्याच्याने त्यांचा चर्म मात्र नव्हे तर पोटातील अवयव सुद्धा वितळून जातील. आणि त्यांना शिक्षा देण्यासाठी लोखंडाचे गाढे असतील. ते भयभीत होवून नरकातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करताना "जाळणाऱ्या शिक्षेची चव पहा" असे म्हणत पुन्हा त्याच्यातच ढकलले जातील. (सुरा 19-22)

**23: अल मुमिणून**

अग्नी त्यांच्या चेहरावरील चर्माला चाटून घेईल. आणि त्यांचे जबडे बाहेर पडतील ते सार्वकालिक नरकामध्येच पडून राहतील. त्यांची आतडी वितळून जाईल असे उखळते पाणी त्यांना पाजण्यात येईल. ते मरणासाठी प्रार्थना करतील पण त्यांची कुचेष्टा केली जाईल. (सुरा 104)

ह्याबद्धल पवित्र शास्त्र सुद्धा असे म्हणते कि "तिथे त्याना चावणारे किडे मरत नाहीत, जाळणारा अग्नी विझत नाही" पण देवाच्या कृपेने नरकाला जाण्यापासून वाचवणारा एक मार्ग आहे. कारण देवाने नरकाची निर्मिती सैतानाला व त्याच्या दुताना शिक्षा देण्यासाठी तयार केली आहे माणसांना शिक्षा देण्यासाठी खचितच नाही.

### स्वर्ग

अरुंद दरवाज्यातून आत जा. नरकाला जाणारे मार्ग रुंद आहे आणि त्याच्यातून जाणारे पुष्कळ आहेत. स्वर्गाला जाणारा दरवाजा अरुंद व मार्ग संकुचित आहे ते मिळवणारे थोडेच आहेत. एखाद्याने सर्व जग मिळविला पण त्याचा आत्मा गमावला तर त्याला काय लाभ? किंवा एखाद्याने आपल्या प्राणासाठी (मोक्ष प्राप्तीसाठी) त्याच्या बदल्यात काय देवू शकेल? असे पवित्र शास्त्र प्रश्न विचारते.

**येशू ख्रिस्ताचा प्रिय शिष्य संत योहानानेही आपल्या दर्शनामध्ये स्वर्गलोक पाहिला, ते त्याने खालील प्रमाणे नोंद करून ठेवले आहेत.**

देवापासून एक नवीन शुद्ध नगरी उतरताना पाहिली ती नवऱ्यासाठी शृंगारलेल्या नवारीप्रमाणे सजविलेली होती. तिच्या ठायी देवाचे तेज होते तिची कांती अति मौल्य रत्नासारखे होते ती स्फटीकाप्रमाणे लखलखाणाऱ्या यास्फे रत्नासारखी होती. तिला मोठा उंच तट होता त्याला बारा वेशी होत्या आणि वेशीजवळ बारा देवदूत होते. तिचा तट यास्फे रत्नाचा होता. आणि नागरी शुद्ध काचेसारखी शुद्ध सोनेरी होती. नगरीच्या तटाचे पाये वेगवेगळ्या मोलवान रत्नाने शृंगारलेले होते. पहिला पाया यास्फे, दुसरा नील, तिसरा शिवाधातु, चौथा पाच, पाचवा गोमेध, सहावा सार्दी, सातवा लसणा, आठवा वैढूर्य, नववा पुष्कराज, दहावा सोनलसनी, अकरावा यकंथ बारावा पद्माराग अश्या त्या रत्नाचे नावे होते. बारा वेशी बारा मोत्यांच्या होत्या. एक एक वेस एक- एका मोत्यांची होती. नगरातील मार्ग पारदर्शक काचेसारखा शुद्ध सोनेरी होता. दिव्याच्या तेजाने ते प्रकाशित केली आहे आणि येशू ख्रिस्तच तिचा दीप. तिच्यात कोणत्याही निषिद्ध गोष्टी प्रवेश करणारच नाहीत.

येशू ख्रिस्तांच्या मोक्षप्राप्त लोकांच्या यादीत ज्यांचे नावे नोंद झाले आहेत त्यांचा मात्र तिच्यात प्रवेश होईल. त्यांच्या बरोबर देव वस्ती करेल ते त्याचे लोक होतील आणि देव स्वतः त्यांच्याबरोबर राहील. तो त्यांच्या डोळ्यांचे अश्रू पुसेल. ह्यापुढे मरण नाही शोक, रडणे, व कष्ट हि नाहीत त्या नगरात येशू ख्रिस्तांचे राजसन असेल त्याच्या दासांना त्याचे दर्शन घडेल. युगानुयुग ते राज्य करतील.

(प्रकटीकरण 21: 9-27)

## 3. मुक्तीचा (मोक्षाचा) मार्ग.

देवदूत पाप केले तेव्हा त्यांना न सोडता, त्यांना नरकात टाकून त्यांचा न्याय निवाडा करण्यासाठी, त्यांना अंधाराच्या खाणीत ठेवले आहे. पण मानवाने पाप केले असता,"**देवाने जगावर एवढी प्रीती केली कि त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला अशासाठी कि जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या कोणाचाही नाश होवू नये तर त्यांना सावर्कालिक जीवन प्राप्त व्हावे."**



ख्रिस्त पूर्व 700 वर्षामागे यशाया नावाचा एक संदेष्टा होवून गेला त्याने भविष्यवाणी केली होती कि "पहा एक कुमारी गर्भवती होईल. तिला एक पुत्र होईल त्याच्या खांद्यावर सत्ता राहील, त्याला अद्भुत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती म्हणतील." (पवित्र शास्त्र)

"प्रारंभी शब्द होता. आणि शब्द देवासह होता. सर्व काही त्याच्याद्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही. त्याच्याठायी जीवन होते व ते जीवन मनुष्यमात्राचा प्रकाश होते. तो शब्द देही झाला, आणि त्याने आम्हामध्ये वस्ती केली आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले. ते पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असे अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होते. त्याच्या पुर्णतेतून अपणा सर्वांना क्रुपेवर कृपा मिळाली आहे. देवाला कोणीही कधीच पहिले नाही; जो एकुलता एक देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रगट केले आहे."

(योहान 1:1-18)

मरिया नावाची एक कुमारी बेथेलहेम ह्या गावाला प्रवास करत असताना, तिला दिवस भरले व तिने आपला प्रथम पुत्र प्रसवला. त्याला तिने बाळत्याने गुंडाळून गव्हाणीत ठेवले कारण त्यांना उतार शाळेत जागा नव्हती. देवदुताने अगोदरच सुचविल्या प्रमाणे त्याचे येशू असे नाव ठेवण्यात आले.

योहान म्हणणारा एक भविष्यवक्ता येशू ख्रिस्ताना पाहून म्हणाला "पहा हा जगाचे पाप हरण करण्यासाठी देवाने नेमलेला देवाचा कोकरा" ते म्हणजे, आम्ही रक्त मांसाच्या शरीराचे असल्याने देव स्वतः देही होवून प्रगट झाला, आत्मा संबंधाने ख्रिस्त (अभिषिक्त) म्हणून ठरविण्यात आला, देवदुताना प्रगट झाला आणि अन्य लोकामध्ये घोषणा करण्यात आला; जगामध्ये विश्वास ठेवण्यात आला, तो गौरवात प्रवेश केला.

प्रभू येशू ख्रिस्त देवाचा स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वतःला रिक्त केले, म्हणजे मनुष्याचा प्रतीरुपाचे होवून दासाचे स्वरूप धारण केले; आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होवून, मरणाने मरणाचा अधिकारी जो सैतान आहे, त्याला निष्क्रिय

करण्यासाठी वधस्तंभांचे मरण सोसले. येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वतःला लीन केले. ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावापेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले. याचा हेतू हा कि स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्विखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा आणि देवापित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबुल करावे. देवाने आम्हाला मोक्ष (मुक्ती) म्हणजे सार्वकालिक जीवन देवू केले आहे. ते जीवन (मोक्ष) प्रभू येशू ख्रिस्तामध्ये आहे. त्यामुळे प्रभू येशू ख्रिस्त त्यांच्याकडे येणाऱ्याना पूर्णपणे तारण्यासाठी सशक्त आहे. दोघे किंवा तिघे जेथे एकत्र जमतील त्यांच्यामध्ये असण्याची आणि "तुम्ही माझ्यामध्ये व माझी वचने तुम्हामध्ये असतील तर जे काही मागणार ते देण्याचे" अभिवचन दिले आहेत. प्रभू येशू ख्रिस्त पाप्यांना शोधून तारण्यासाठी ह्या जगात आले हे वचन विश्वसनीय व स्वीकारवयास योग्य आहे. ते आपल्या लोकांना त्यांच्या पापापासून तारील.

प्रभू येशू बकरे व वासरे ह्यांचे नव्हे तर स्वतःचे रक्त अर्पण करून एकदाचं परमपवित्र स्थानात गेला, त्याने सार्वकालिक मुक्ती मिळवली. सार्वकालिक आत्म्याचे योगे ज्याने निष्कलंक अशा स्वतःस देवाला अर्पण केले त्या ख्रिस्ताचे रक्त आपली सद्सद्विवेकबुद्धी जिवंत देवाच्या सेवेसाठी निर्जीव कृत्यापासून किती विशेषकरून शुद्ध करील?

### प्रभू येशू ख्रिस्त हे देवाचे पुत्र आहेत, ह्यासाठी पवित्र शास्त्रामधून मिळालेले पुरावे.

1) देवाने स्वतः सांगितले आहे **"हा माझा परम प्रिय पुत्र आहे ह्यावर मी संतुष्ट आहे."** (मत्तय 3:17)

2) येशू ख्रिस्ताचे शिष्य पेत्राने दिलेले साक्ष **"आपण ख्रिस्त (अभिषिक्त) जिवंत देवाचे पुत्र आहात."** (मत्तय 16:16)

3) प्रभू येशू ख्रिस्ताला वधस्तंभावर चढवलेला शताधीपतीनि दिलेले साक्ष **"खरोखर हा देवाचा पुत्र होता."** (मत्तय 27:54)



4) येशू ख्रिस्तांच्या 12 शिष्यांपैकी एक थोमा पुनरुत्थान पावलेला ख्रिस्ताला पाहिल्यानंतर दिलेले साक्ष **"माझा प्रभू, माझा देव !"** (योहान 20:28)

5) येशू ख्रिस्ताने स्वतः दिलेले साक्ष **"ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे, मी पित्यामध्ये आहे व पिता माझ्यामध्ये आहे."** (योहान 14:8-10)

6) भुते देखील जेव्हा जेव्हा येशूला पाहिले तेव्हा तेव्हा तेही साक्ष देत होते कि **"तू देवाचा पुत्र आहे."** (मार्क 3:11)

## 4. क्षमा / दया.

भगवतगिताच्या ज्ञान योग 4: 8 मधील एक श्लोक ह्याप्रमाणे आहे.

***परित्रणाय साधुनाम विनाशाय च दुस्क्रिताम् ।***
***धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥***

***Paritrāṇāya sādhūnām̐ vināśāya cha duṣkṛtām I***
***Dharmasam̐sthāpanārthāya sambhavāmi yuge yuge II***

म्हणजे 'दुष्टांचा संहार करून शिष्टांचा परिपालन करून युगानुयुग धर्माची स्थापन करण्यासाठी मी परत परत अवतार घेतो.' असे जर घडले तर सर्व जगालाच नाश करावे लागणार. मग फक्त देवच राहणार. पण देव हा प्रेमस्वरूप आहे. ह्या बददल पवित्र कुराण **"महा करुणामयी दयानिधी असा जो अल्लाह ह्याच्या नावाने" असे सांगत प्रारंभ होते. पवित्र शास्त्रामध्ये देव बोलत आहे कि "माझ्या जीविताची शपथ दुष्टांच्या मरणात मला संतोष नाही तो आपला दुष्ट मार्ग सोडून जगावे ह्यात मला संतोष आहे."** देव जर आमच्या अपराधास योग्य अशी शिक्षा दिले असते तर आम्ही कोणी जिवंत राहिलो नसतो. आम्ही जिवंत आहोत हे देवाची दया आहे. त्याची दया थांबत नाही ती रोज नवी होते.

एकदा दोघे प्रार्थना करण्यासाठी मंदिरात गेले. एक होता परुशी, एक होता जकातदार. परुश्याने उभे राहून स्वतःशी असे प्रार्थना केले कि “हे देवा इतर माणसे लुबाडणारे, अधर्मी, व्यभिचारी आहेत, त्यांच्यासारखा किंवा ह्या जाकातदारा सारखाही नाही म्हणून मी तुझे उपकार मानतो. मी आठवड्यातून दोनदा उपास करितो; जे मला मिळते त्या सर्वांचा दशांश देतो.” जकातदार तर दूर उभे राहून वर स्वर्गाकडे दृष्टी लावण्यास देखील न धजता आपला उर बडवीत म्हणाला “हे देवा मज पाप्यावर दया कर.” मी तुम्हास सांगतो त्या दुसऱ्यापेक्षा हा नीतिमान ठरून खाली आपल्या घरी गेला. पण तो परुशी तसे बनून गेला नाही असे पवित्र शास्त्र सांगते.

आमच्या भारताच्या संविधानामध्ये, देशाचा राष्ट्रपती ह्यांना क्षमादान देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. आणि त्या क्षमेबद्धल छान अशी व्याख्या दिले आहे.

क्षमा / दया हे अनुग्रहाचे कार्य आहे. हे हक्काने मागू शकत नाही. क्षमा अपराध्याला सर्व शिक्षेपासुन व दंडापासून व अयोग्यतेपासून सोडवते. आणि त्या व्यक्तीला कधीही गुन्हा न केलेल्या माणसाच्या स्थानात उभे करते. ती व्यक्ती अपराधी म्हणून ठरवण्याच्या अगोदर जर क्षमा प्रदान केले गेले, तर त्याला होणाऱ्या सर्व शिक्षा आणि दंड आणि अयोग्यता ह्यांना ती आढवते. जर तो अपराधी म्हणून निर्णय झाल्यानंतर क्षमा दिली गेली तर त्याला झालेल्या शिक्षा व दंड आणि अयोग्यता ह्यांना काढून टाकते. (कलम 72) निर्माणकर्ता आणि आकाश व पृथ्वीचा निर्माणकर्ता परमेश्वराला किती अधिकार असेल त्याची कल्पना करा.

देशाचा प्रथम नागरीक आणि थोर राष्ट्रपती ह्यांना एवढे अधिकार असेल तर आमचा त्याच्या निर्णयाला कोणाच्याने प्रतिप्रश्न करणे जमेल का? अथवा दुर्लक्ष करता येईल का? विचार करा.

प्रभू ख्रिस्ताने आमच्या सर्व अपराधांच्या यादीला वधस्तंभावर खिळवून नाहीशी केल्याने आता आम्हाला दंडाज्ञा नाही. म्हणून आता आम्ही देवाच्या कृपेच्या आधीन आहोत. असे पवित्र शास्त्र सांगत आहे.



## 5. प्राचीन वेदामधील प्रजापती आणि पशु (यज्ञाचा) बळीचा विधी.

प्राचीन ग्रंथा प्रमाणे पूर्वी, सर्व मानवांचे पाप परीहारासाठी देवासमोर यज्ञ अर्पण करत होते. ह्या यज्ञार्पण करण्याचे विधी व क्रम कृष्ण यजुर्वेदामध्ये असा उल्लेख आढळतो.

| कृष्ण यजुर्वेदमें आनेवाले क्रम | यीशु मसीह में उसकि पूर्ति |
|---|---|
| पशुं स्नपयन्ति कूटकर्णखण्डश्लोणसप्तशफ वर्जम् ॥<br>(आपस्थंब श्रौथ सूत्र - 7-12-1 पृष्ठसंख्या: 421)<br>*Paśuṁ snapayanti kūṭakarṇakhaṇḍaslōnā saptaśāpha varjaṁ\|\|*<br>Āpastamba-Śrauta-sūtra (7-12-1 Page No: 421) | |
| अर्थ: यज्ञाचा पशु पवित्र असावे आणि पूर्ण अंगाचे पाहिजे. | येशू ख्रिस्त मनुष्याच्या वीर्याने जन्म घेतले नसल्याने त्याच्यामध्ये जन्मता: पाप नाही.<br>(पवित्र कुराण)<br>येशू ख्रिस्ताच्या मनात पासून पाप न होता<br>(योहान 8:46) |

| | |
|---|---|
| धर्षा मानुषानिति नि युनक्ति धृत्या अद्भ्यस्त्वौषधीभ्यः ॥<br>(त्रैतर्य संहिता कांड ६, Q No. 3, पृष्ठसंख्या: 304)<br>***dharṣhā mānuṣhān' iti ni yunakti dhṛtyā \|\|***<br>Traittirīya-Samhitā (kanda 6, Q. No.3, Page No:477) | |
| **अर्थ:** यज्ञपशू युप स्तंभाला बांधावे. | गुलगुथा येथे त्यांनी येशूला वधस्तंभावर खिळ्यांनी ठोकले. आणि पिलाताने एक वाक्य लिहिले आणि ते वधस्तंभावर लावले. त्यावर असे लिहिले होते की, “येशू नासरेथकर-यहूद्यांचा राजा” (योहान 19:18-19) |

अमायुं कृण्वन्तं संज्ञपयत इत्युक्त्वा पराङावर्ततेऽध्वर्युः ॥

(आपस्थंब श्रौथ सूत्र = 7-16-6 पृष्ठसंख्या: 433)

***Amayūṁ kr̥ṇvantaṁ saṅganapayata ityuktvā paradāvartatē dhvaryuḥ||***

Āpastamba-Śrauta-sūtra (= 7-16-6, Page No: 433)

| | |
|---|---|
| **अर्थ**: यज्ञ पशु मौन असावे. आणि बळी देणे हिंसा दिल्या प्रमाणे होवू नये. (हाडे मोडले जावू नये) | त्याने दुःखात स्वतःला नम्र केले, तोंड उघडले नाही; कत्तलीकडे नेणाऱ्या मेंढराप्रमाणे कातरण्याआधी एक मूक मेंढी होती, त्याने कधीही तोंड उघडले नाही. (प्रेषित यशयाचे पुस्तक 53:7)<br><br>पण जेव्हा ते येशूकडे आले आणि त्यांनी पाहिले की तो मेला आहे, तेव्हा त्यांनी त्याचे पाय मोडले नाहीत. ( योहान 19:33) |

दधातीडामुप ह्वयते पशवो वा इडा पशूनेवोप ह्वयते ॥

(त्रैतर्य संहिता कांड 6, Q no 3, पृष्ठसंख्या: 308)

***dadhātiiḍāmupa hvayae pashavo vā iḍā pashūnevaupa hvayate ||***

Taittirīya-Samhitā (kanda 6, Q. No. 3, Page No: 495)

| | |
|---|---|
| **अर्थ**: यज्ञ पशूचे मांस सेवन करावे. | येशू भाकर घेतले व आभार मानून ते मोडले आणि म्हटले "हे माझे शरीर आहे ते तुमच्याकरीता आहे हे घ्या व खा." (मत्तय 26: 26-27) |



वपाश्रपणी पुनरन्वारभतेऽस्मिन्नेव लोके प्रति तिष्ठति ॥

(त्रैतर्य संहिता कांड 6, Q no 3, पृष्ठसंख्या: 306)

***vapāshrapaṇī punaranvārabhateasminneva loke prati tishṭhati ||***

Taittirīya-Samhitā (kanda 6, Q. No. 3, Page No: 486)

| | |
|---|---|
| **अर्थ:** यज्ञाच्या पशुला काटे टोचावे. | त्यांनी त्याचीं वस्त्रे काढून त्याच्या अंगात किरमिजी झगा घातला: काट्यांचा मुकुट गुंफून त्याच्या मस्तकावर ठेविला. त्याच्या उजव्या हातात वेत दिला आणि त्याच्यापुढे गुडघे टेकून, "हे यहुद्यांच्या राजा, नमस्कार!" असे म्हणून त्यांनी त्याची थट्टा मांडिली. (मत्तय 27: 28) |

यत्पशुरपां पेरुरसीत्याहैष ह्यपां पाता ॥

(त्रैतर्य संहिता कांड 6, Q no 3, पृष्ठसंख्या: 304)

***yatpashurapām perurasiityāthaeṣha hiapām pātā ||***

Taittirīya-Samhitā, (kanda 6, Q. No. 3, Page No: 478)

| | |
|---|---|
| **अर्थ**: यज्ञाच्या पशुला रस पाजावे. | तेव्हा त्यांनी त्यास पित्तमिश्रित द्राक्षरस प्यायला दिला. त्याने तो चाखला. पण पिण्यास नकार दिला. (मत्त. 27:34) |

| स आत्मनो वपामुदख्खिदत्तामग्नौ प्रागृह्णात् ॥<br>(थ्यथ्रीया समिथा कांडा 2, पहला अवतारा दूसरी हरसू, पृष्ठसंख्या : 62)<br>*Sa ātmano vapāmudakkhidattāmagnau prāgṛhṇāt ||*<br>Taittirīya-Samhitā (kanda 2,1st Awathaar, 2nd Hanasu, Page No: 3) | |
|---|---|
| **अर्थ**: प्रजापती आपले स्वतःचे देह होम केला. | येशूने बकरे व वासरे ह्यांचे नव्हे तर स्वतःचे रक्त अर्पण करून एकदाचं परमपवित्र स्थानात गेला. आणि त्याने सार्वकालिक मुक्ती मिळवली. कारण बकऱ्याचे व बैलाचे रक्त आणि कालवडीची राख हि अशुद्ध झालेल्यावर सिंपडल्याने जर देहाचे शुद्धी होईल इतके पवित्र करितात तर सार्वकालिक आत्म्याच्या योगे ज्याने निष्कलंक अशा स्वतःस देवाला अर्पण केले त्या ख्रिस्ताचे रक्त आपली सद्सद्विवेकबुद्धी देवाच्या सेवेसाठी निर्जीव कृत्यापासून किती विशेषकरून शुद्ध क रील? (इब्री 9: 12-14) |

वेदकालीन यज्ञ जे सर्व मानवांसाठी अर्पण केले जात होते ते यज्ञ पशु आणि वधस्तंभावर स्वतःचे केलेल्या यज्ञाला 100% साम्य दिसत आहेत कि नाही?



## 6. प्रभू येशू ख्रिस्तांचे पुनरुत्थान आणि स्वर्गारोहण.

आठवड्याचे पहिल्या दिवशी काही शिष्य प्रभू येशू ख्रिस्तांची कबर पहावयास आले. तेव्हा मोठा भूमिकंप झाला. देवदूत स्वर्गातुन उतरला, त्याने धोंड एकीकडे लोटली आणि त्यावर तो बसला. व त्याना म्हणाला "**तुम्ही भिवू नका वधस्तंभावर खिळलेल्या येशूचा शोध तुम्ही करीत आहां हे मला ठावूक आहे. तो येथे नाही कारण त्याने सांगीतल्या प्रमाणे तो उठला आहे. या! तो निजला होता तो ठीकाण पहा."** त्यानंतर प्रभू येशू त्यांना सामोरे येवून "तुम्हाला शांती असो" असे अभिवादन केले. शिष्य त्याच्याजवळ येवून नमस्कार केले. त्यादिवशीच तो अनेक इतर शिष्यांना दिसला व त्यांवर फुंकर घालून त्यांना असे म्हणाले की "पवित्र आत्म्याचा स्वीकार करा, तुम्ही कोणाचे पापे क्षमा करता त्यांच्या पापांची त्याना क्षमा मिळेल जर कोणाचे पापे तुम्ही क्षमा करणार नाही त्यांचे तसेच राहील."

त्या वेळी शिष्यामधील एक थोमा तिथे नव्हता. आणि तो म्हणत होता कि "त्याच्या हातात खिळ्याचे वण पाहिल्याशिवाय, खिळे होते त्या जागी आपले बोट घातल्यावाचून, आणि त्याच्या कुशीत आपला हात घातल्यावाचून मी विश्वास ठेवणार नाही." मग आठ दिवसांनंतर त्याचे शिष्य पुन्हा एकदा आत असता थोमा हि त्यांच्याबरोबर होता. दरवाजे बंद होते. तेव्हा प्रभू येशू प्रत्यक्ष झाले व म्हणाले "तुम्हाला शांती असो." नंतर त्यांना म्हणाले कि "तुम्ही का घाबरला? व तुमच्या मनात संशय का उद्भवते? माझे हात व पाय पाहा; मीच तो आहे मला चाचपून पहा. जसे मला हाड मांस असलेले पाहता तसे भूताना नसते." मग त्यांच्याजवळ येवून एक भाजलेल्या माशाचा तुकडा खावून दाखविला. मग थोमाला म्हणाला कि "तुझे हात इकडे कर व मला व माझे हात पहा व आपला हात पुढे करून माझ्या कुशीत घाल, आणि विश्वासहीन असू नको, विस्वास ठेवणारा ऐस." थोमाने त्यांना म्हणाले "माझा देव, माझा प्रभू!" येशूने त्याला म्हणाले "तू मला पहिले आहे म्हणून विश्वास ठेवला आहे न पाहिल्यावाचुन विश्वास ठेवणारे ते धन्य." हाच शिष्य आमच्या भारत देशाला येवून, केरळ आणि तामिळनाडू ह्या राज्यामध्ये प्रभू येशू ख्रिस्तांचे

शिक्षण शिकविले आहे. आणि हा शिष्य आमच्या देशातच मेला आणि आमच्या भारतासाठी येशू ख्रिस्तांची साक्ष झाला आहे.

पुनरुत्थानानंतर प्रभू येशु ख्रिस्त हे 40 दिवस आपल्या शिष्यांना जागोजागी दर्शन दिल्या नंतर, गलील प्रांतातील एका ठिकाणी आपल्या शिष्यांसोबत जमले असताना, त्याचे शिष्य त्यांना दंडवत घातले. तेव्हा प्रभू येशू जवळ येवून म्हणाले कि "स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आले आहे. तेव्हा तुम्ही जावून सर्व जगाला मुक्तीच्या मार्गाची घोषणा करा जे ह्यावर विश्वास ठेवतील त्यांच्या द्वारे चमत्कार घडतील, माझे नाव सांगून ते भुते घालवतील, नविन नवीन भाषा बोलतील सर्प उचलतील. जर विष प्याले तरी ते त्याना बाधणार नाही. ते रोगी लोकावर हात ठेवल्यास ते बरे होतील." नंतर ते अंदाजे 500 लोकांच्या उपस्थितीमध्ये आकाशात वर चढले आणि देवाच्या उजवीकडे जावून बसले. इकडे त्यांचे शिष्य निघून जावून सर्वत्र त्यांचे उपदेश व शिक्षण सर्वांना सांगू लागले. आज जे प्रभू येशू ख्रिस्तांची उपासना करत आहेत ते कोणी मेलेल्या संताचे नव्हे तर मरणाला जिंकलेले, सर्वकाळ जिवंत असणारे मृत्युंजय असा ख्रिस्ताचे होय.

जरी येशू ख्रिस्ताची समाधी सरकारी शिक्का मारून सुरक्षित आणि संरक्षित केली गेली असली तरी, पूर्वी म्हटल्याप्रमाणे त्याचे पुनरुत्थान झाले म्हणून त्याचे मृत शरीर थडग्यात नाही. त्यामुळे त्याच्या पुनरुत्थानाबद्दल कधीही गोंधळ होणार नाही. त्यामुळे आज जग मेलेल्या येशू ख्रिस्ताची नव्हे तर मृत्यूवर विजय मिळविलेल्या सनातन पुनरुत्थित येशू ख्रिस्ताची उपासना करते.

## 7. प्रभू येशू ख्रिस्त परत येणार आहे.

प्रभू येशू ख्रिस्तांचे स्वर्गारोहण होत असताना देवदूतांनी त्यांच्या शिष्यांना सांगितले होते कि "अहो, गलीलकरानो, तुम्ही आकाशाकडे का पाहत आहात? हा जो प्रभू येशू ख्रिस्त जसे आकाशात चढताना पाहिला तसेच तो परत येताना पाहाल." (प्रेषितांचे कृत्ये 1: 9-11)



प्रभू येशू देवाच्या तेजाने आपल्या दुतांसमावेत लवकर येणार आहे. येवून ज्याच्या त्याच्या कृत्याप्रमाणे त्याना प्रतिफळ देणार आहे. मरणाच्या आणि अधोलोकाचे चाव्या त्याच्या हातात आहेत. (मत्तय 16:27; प्रकटीकरण 22:12)

कारण, जेव्हा मोठ्याने मुख्य देवदूताच्या आवाजात आणि देवाच्या कर्ण्याच्या आवाजात आज्ञा दिली जाईल, तेव्हा, प्रभु स्वत: स्वर्गातून खाली उतरेल आणि जे ख्रिस्तात मेले होते ते प्रथम उठतील. मग आपल्यापैकी जे जिवंत असतील ते प्रभूला अंतराळात भेटण्यासाठी त्यांच्याबरोबर ढगात वर घेतले जातील. आणि अशा प्रकारे आम्ही प्रभूबरोबर सदासर्वकाळ राहू.

(1थेस्सलनीकाकरांस 4:16-17)

"त्यामुळे तुम्ही सुद्धा तयार असा. तुम्ही अपेक्षा न केलेल्या घटकेत त्यांचे येणे होईल. कडूपणा, नशा, जगिक चिंता ह्याने त्रस्त होवून, तुमचे हृदय दबून जावू नये, म्हणून सावध असा. तो दिवस तुमच्यावर एक पाश म्हणून उतरेल. जागृत रहा." (लुक 21: 34-36)

येशू ख्रिस्तांची आज्ञा मानणारे व त्याप्रमाणे चालणारे धन्य होत. त्यांना जीवनाच्या झाडावर हक्क राहील. ते स्वर्गामध्ये (मुक्तीच्या स्थळी) प्रवेश करतील. (प्रकटीकरण 22:14)

## ह्या बद्धल पैगंबर महम्मद ह्यांनी असे बोलले आहेत.



ह्या बद्धल पैगंबर महम्मद ह्यांनी असे बोलले आहेत. "इसा (येशू) ह्यांना अल्लाहच्या संदेशवाहक असे जो विश्वास ठेवत नाही तो मुस्लीमच नाही त्याच्या संदेष्टेपणाला नाकारणारा इस्लाम धर्मातून भ्रष्ट होईल. "पवित्र कुराण मध्ये नावानिशी एखाद्या स्त्रीचे जर उल्लेख आला आहे तर ते फक्त माता मारीयम यांचे होय. त्यांच्या चरित्राला कुराण जगासमोर एक आदर्श व्यक्ती असे सादर करते. "माझे प्राण ज्याच्या हातात आहे त्याची शपथ देवून सांगतो कि मरियम ह्यांचे पुत्र खचित तुमच्यामध्ये नीतिमान न्यायपूर्ण अधिकारी म्हणून उतरणार आहे. इसा ह्यांचे परत येणे होई पर्यंत पुरुत्थान होणार नाही."

## 8. पापासून सुटका कोणापासून?

अगदी प्राचीन काळापासून आमचा भारत देश हे नागरीकतेसाठी प्रसिद्ध आहे. प्राचीन काळापासून आमचे ऋषीमुनीं ध्यान व मनन ह्यासाठी प्रसिद्ध होते. त्यालाच एक उदाहरण म्हणजे बृहद्काराण्याकोपानिशत 1:3:28 मध्ये फार अर्थगर्भित प्रार्थना आहे.

***Asato mā sadgamaya* / *tamaso mā jyotirgamaya* /**

***Mrityormā amritamgamaya* / *Oṁ śhānti śhānti śhānti ḥ* / /**

*असतो मा सद्गमय।   तमसो मा ज्योतिर्गमय।*
*मृत्योर्मा  अमृतंगमय। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।।*

**श्लोकाचे अर्थ** :

देवा मला असत्यापासून सत्याला,

अंधारातून प्रकाशाकडे,

मरणापासून सार्वाकालील जीवनाकडे,

अशांतीपासून शांतीकडे आम्हाला चालीव.

प्रभू येशू ख्रीस्तानी सांगितले आहे **"मीच मार्ग, सत्य, व जीवन आहे माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे (देवाकडे) म्हणजे स्वर्गाकडे कोणी येवू शकत नाही."** (योहान 14:6)

प्रभू येशू ख्रिस्त इथे मीच असे सांगण्यासाठी एक तर तो फसवणारा, किंवा मानसिक आजारी असावे नाहीतर तेच सत्य (खर वास्तव) असायला पाहिजे. मग प्रभू येशू फसवणारा, किंवा मानसिक आजारी होता का तेच सत्य होते हे पुढच्या पानावरील मजकूर वाचून तुम्हीच ठरवा.



## 9. येशू ख्रिस्ताचे म्हणणे आम्ही का बरे मानावे?

प्रभू येशू ख्रिस्त काही काल्पनिक व्यक्ती नव्हे तो एक ऐतिहासिक पुरुष आहे. त्यांनी ह्या जगात जन्म घेतलेले अनेक पुरावे आहेत. त्यांच्या रक्ताने माखलेला एक कापड आजूनही लंडनच्या वस्तू संग्रालयात सुरक्षित ठेवले आहे. ते येशू ख्रीस्ताचेच आहे आहे हे वैज्ञांनीकानी सुद्धा दुजोरा दिले आहे. ते आमच्या आशीया खंडातच जन्म घेतलेले असल्यामुळे ते आमचेच आहेत. त्यांच्या 12 शिष्यांपैकी एक शिष्य आमच्या भारतात आले होते. आणि प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्या जन्माने पूर्ण जगाचा इतिहास ***ख्रिस्त पूर्व*** **(BC)** आणि ***ख्रिस्त शक (AD)*** असे दुभागाला आहे. ह्या सर्व पुराव्यानुसार आणि खालील सत्य समजून घेतल्यावर प्रभू येशू खरे असल्याने ते जे सांगितले आहेत ते ते खरेच आहेत असे आपण विश्वास ठेवू शकतो.

1) येशू परिपूर्ण पवित्र होते. (पान. न. 31 पहा)

2) येशू बोलल्याप्रमाणे चालणारे होते आणि त्यांचे शिक्षण अख्या जगात पसरले आहेत. (पान. न. 34 पहा)

3) त्यांना निसर्गावर आणि मरणावर देखील अधिकार होते. त्यांनी अनेक असाधारण चमत्कारे केलेले आहेत. (पान. न 38 पहा)

4) खिस्तांचे बोल व चाल दोन्ही अधिकाराने भरलेले होते. ते वधस्तंभावर असताना सहा तास वेदना सहन करत होते तेव्हा त्यांनी अगदी अस्खलितपणे सात वाक्ये बोलले आहेत त्यावरून त्यांना, एक मानसिक आजारी असणारी व्यक्ती म्हणताच येत नाही. (पान न.53 पहा)

5) त्यांच्या सेवेला किती अडथळे आले, विरोध झाला तरी त्यांची सेवा कधीच थांबली नाही आणि पुढे हि थांबणार नाही. (पान. न. 55 पहा)

6) पवित्र शास्त्र ह्यावर विश्वास ठेवून त्याच्या शिक्षणानुसार जो वागतो त्याला दैविक ज्ञान मिळते हे स्पष्ट झाले आहे. (पान. न. 67 पहा)

खिस्तांच्या जन्माबद्दल पवित्र शास्त्रामध्ये असे सांगितले आहे कि 'पहा एक कुमारी गर्भवती होईल आणि तिला एक पुत्र होईल'. तसेच पवित्र कुराण मध्ये सुद्धा खालील प्रमाणे नोंद झाले आहे.

## पवित्र कुराण 3 आली इम्रान

3. Al-i'Imran      سُوۡرَةُ آل عِمرَان      ٣

45: (وہ وقت بھی یاد کرنے کے لائق ہے) جب فرشتوں نے (مریم سے کہا)

کہ مریم خدا تم کو اپنی طرف سے ایک فیض کی بشارت دیتا ہے جس کا نام مسیح (اور مشہور) عیسیٰ ابن مریم ہوگا (اور) جو دنیا اور آخرت میں باآبرو اور (خدا

کے) خاصوں میں سے ہوگا

**अर्थ:** देवदूत असे बोलले "ओ मरियम अल्लाह तुला एक फरमान (आज्ञा) सुवार्ता देत आहे. त्याचे नाव मरीयमचे पवित्र ख्रिस्त (इसा) म्हणून असेल. तो भूमीवर आणि स्वर्गामध्ये प्रतिष्ठित असेल आणि त्याला मी माझा संदेष्टा नेमीन."

47: مریم نے کہا پروردگار میرے ہاں بچہ کیونکر ہوگا کہ کسی انسان نے مجھے ہاتھ تک تو لگایا نہیں فرمایا کہ خدا اسی طرح جو چاہتا ہے پیدا کرتا ہے جب وہ کوئی کام کرنا چاہتا ہے تو ارشاد فرما دیتا ہے کہ ہوجا تو وہ ہو جاتا ہے

**अर्थ:** हे ऐकून मरीयम म्हणाली – "हे माझे प्रभू मला मुल कसे होणार? मी अजून पुरुषाला स्पर्श देखील केलेली नाही." उत्तर मिळाले, "तसेच घडेल." अल्लाह स्वतःला जे इष्ट वाटेल तेच तो करितो. जर एखादे काम करण्याचे ठरवल्यावर 'होवू दे' असे म्हणतो. आणि ते घडून जाते.

49: اور (عیسیٰ) بنی اسرائیل کی طرف پیغمبر (ہو کر جائیں گے اور کہیں گے) کہ میں تمہارے پروردگار کی طرف سے نشانی لے کر آیا ہوں وہ یہ کہ تمہارے سامنے مٹی کی مورت بشکل پرند بناتا ہوں پھر اس میں پھونک مارتا ہوں تو وہ خدا کے حکم سے (سچ مچ) جانور ہو جاتا ہے اور اندھے اور ابرص کو تندرست کر دیتا ہوں اور خدا کے حکم سے مردے میں جان ڈال دیتا ہوں اور جو کچھ تم کھا کر آتے ہو اور جو اپنے گھروں میں جمع کر رکھتے ہو سب تم کو بتا دیتا ہوں اگر تم صاحب ایمان ہو تو ان باتوں میں تمہارے لیے (قدرت خدا کی) نشانی ہے




**अर्थ:** इसा सांगितलेले: "मी तुमच्याकडे तुमच्या प्रभूच्या चीन्हासोबत आलों आहे. मी तुमच्या समोर पक्षीसारखे एक आकार बनवितो आणि त्यामध्ये स्वास फुंकतो आणि ते जिवंत पक्षी बनेल मी अल्लाहाच्या आज्ञेने जन्मांधाला, व कुष्ठ रोग्यांना बरे करतो. आणि त्याच्या आज्ञेने मेलेल्यांना जिवंत करतो."

55: اس وقت خدا نے فرمایا کہ عیسیٰ! میں تمہاری دنیا میں رہنے کی مدت پوری کرکے تم کو اپنی طرف اٹھا لوں گا اور تمہیں کافروں (کی صحبت) سے پاک کر دوں گا اور جو لوگ تمہاری پیروی کریں گے ان کو کافروں پر قیامت تک فائق (وغالب) رکھوں گا پھر تم سب میر ے پاس لوٹ کر آؤ گے تو جن باتوں میں تم اختلاف کرتے تھے اس دن تم میں ان کا فیصلہ کردوں گا

**अर्थ:** अल्लाह असे बोलले : "हे इसा, मी आता तुम्हाला माझ्याकडे घेईन. जे तुम्हाला धिक्कारिले आहे त्यांच्या मध्ये तुम्हाला पवित्र करेन आणि तुझ्या पुनरुत्थानापर्यंत तुझे अनुसरण करणाऱ्याना जे तुलां नाकाराणाऱ्या समोर उंच उठवेन. सरते शेवटी तुम्हा सर्वांना माझ्या कडेच येणे आहे."

## महात्मा गांधीजींची साक्ष



मानवाना लाभलेले अति उत्तम गुरु पैकी प्रभू येशू एक आहेत. त्यांचे परमेश्वराशी असणारी जवळीकतेला, त्याचेच जीवन एक उत्तम उदाहरण आहे. परमेश्वराचा संकल्प आणि शक्ती प्रभू येशू प्रख्यात केल्याप्रमाणे दुसरे कोणीही प्रख्यातीस आणले नाही. म्हणूनच आम्ही त्याला देवाचा पुत्र म्हणून समजतो.

**-महात्मा गांधीजी**

एखदा एक गोरां माणूस गांधीजीना पाहून विचारला कि "तुम्ही भारताला स्वातंत्र्य कसे आणून द्याल?" ते शांत चित्ताने पवित्र शास्त्रातील मत्तयचा ५ अध्याय उघडून दाखवले आणि म्हणाले की 'शांत चित्त ते धन्य कारण ते पृथ्वीचे वतन भोगतील' हे तुम्ही वाचले नाही काय? मीही शांत मनाचा होवून भारताला स्वातंत्र्य मिळवून देवू शकत नाही काय? आमच्या देशाला स्वातंत्र्य मिळाले ते, ख्रिस्ताने

स्वतः वागून, शिकवलेले, अहिंसा मार्ग गांधीजीनी पत्करल्यामुळेच होय. नाहीतर आजून किती देशभक्ताना आपला प्राण गमवावा लागत होता कोण जाणे? ह्या त्यांच्या धाडसी पावलामुळेच, त्याना महात्मा असा नाव मिळाला. राष्ट्र पिता होण्याचा मानही मिळाला आणि आमच्या देशाच्या चलनावर त्यांचाच भाव चित्र छापण्यात येते.

जेव्हा त्यांची हत्या झाली तेव्हा ते कोणी देशाचा प्रधान, किंवा अध्यक्ष नव्हते, त्यांना स्वतःचा घर देखील नव्हते, बँक मध्ये खाता ही नव्हता, त्यांची संपत्ती म्हणजे थोडे कपडे, एक जोडी चप्पल, आणि एक घड्याळ. ते काही दिसण्यास सुंदर ही नव्हते. अर्धनग्न फकीर असे ओळखले जात असणार्या ह्या माणसाची हत्या झाली तेव्हा अमेरिका देशाचे न्यूयार्क मधील विश्व संस्थ्यावरील ५५ देशाचे झेंडे अर्ध्यापर्यंत उतरवून गौरव देण्यात आला. असले गौरव जगामध्ये इतर कोणालाही आजून मिळाले नाही. हे एक आम्हा भारतीय लोकाना अभिमानाचा विषय नक्कीच आहे. त्यांचा जन्मोत्सव अनेक देशामध्ये पाळण्यात येत आहे.

## 10. पवित्र शास्त्राचे चरित्र. (बायबल चा इतिहास)

बायबल हा शब्द ग्रीक बिब्लोस या पासून आला आहे. बिब्लोस म्हणजे पुस्तकांचा गट अथवा गुंडाळ्या. अनेक पुस्तके मिळवून तयार केले महापुस्तक म्हणजेच बायबल. वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेले 40 पेक्षा जास्त लेखाकांनी अंदाजे 1500 वर्षाच्या काळात लिहिलेले त्या प्राचीन पुस्तकांचा संग्रह म्हणजेच बायबल आहे. पवित्र शास्त्रातील काही भाग तोंडी सांगण्यात आले होते. त्यांना वेगवेगळे साधन वापरून लिहिण्यात आले. हे आफ्रिका, आशिया आणि युरोप इथे चर्मपत्रावर, गवताच्या काडीपासून तयार केलेल्या गुंडाळ्यावर, दगडावर, इब्री, अरामी, आणि ग्रीक भाषेत लिहिण्यात आले आहेत. त्यासर्वांना एकच पुस्तक म्हणून जोडायला जमले नाही कारण त्याचा आकार वेगळा होता आणि ग्रीक हे डावीकडून उजवीकडे लिहिले जाते तर हिब्री, आणि अरामी लिखाण हे उजवीकडून डावीकडे लिहिले जाते. पूर्ण जगातच पहिले छपाई केलेलं पुस्तक म्हणजे 1456 मध्ये लटीन भाषातील पवित्र शास्त्र. होय.



भारतामध्ये पहले बायबल 1727 मध्ये तमिळ भाषेत छापले गेले. विल्यम केरी ह्यांनी भाषांतर केलेले कन्नड बायबल 1865 मध्ये जान हंड्स एक इंग्रजी पंडित बल्लारी या गावी पूर्ण केले. बायबल (पवित्र शास्त्र) ह्यामध्ये पूर्णपणे एकी दिसून येते. कोणतेही पुस्तक किंवा विषय स्वतःस विरोधाभास दाखवत नाही. ह्यामध्ये जगाच्या प्रारंभापासून अंतापर्यंतचे सर्व विषय ह्यामध्ये सापडतात. आणि ह्यातील प्रत्येक गोष्टींचा वैज्ञानिक रीत्या पडताळणी झालेली आहे. ह्याचे संदेश एका व्यक्तीला सन्मार्गाकडे आणणे किंवा त्याचे परिवर्तन करणे आहे. आणि हे सर्व काळ / देश / संस्कृती ह्या सर्वाना लागू होते. म्हणून ह्या ग्रंथाचा निर्माणकर्ता देवच आहे, हा विश्वास वाढतो. आतापर्यंत बायबल अंदाजे 3000 भाषेमध्ये छापले गेले आहे. आणि जगातील 95% माणसे आपल्या मातृभाषेत हा ग्रंथ आता वाचू शकतात. प्रत्येक ख्रिस्ती आणि विश्वासणारे कुटुंब ह्यांच्याकडे किमान एकतरी प्रत असते आणि प्रत्येक वर्षी करोडो प्रतींची विक्री होतच असते. म्हणून हे पुस्तक साधारण आणि खोटे नाही तर पूर्ण सत्य आहे, ह्यावर विश्वास ठेवू शकतो.

आमच्या देशाच्या रुपयाचे नोटावर ख्रिस्त पूर्व 400 वर्षा अगोदर आमच्या देशावर राज्य केलेला सम्राट अशोक चक्रवर्ती ह्यांचे स्तंभ असून त्यावर अथर्वण वेदाच्या मांडकोपनिशत मधील उतारा **सत्यमेव जयते** (Truth Alone Triumphs) हा घ्येय वचन आहे. त्याचा अर्थ सत्य हेच जिंकते आणि टिकते. असे होतो. जर येशू ख्रिस्त फसवणारे आणि लबाड होते तर आतापर्यंत राहिले नसते आणि वाढले हि नसते. प्रभू येशू ख्रिस्तांचे शिक्षण आज अख्या जगात पसरले आहे. असंख्य लोकांचे जीवन परिवर्तन होवून, सन्मार्गाला लागले आहेत.

अख्या इतिहासात ख्रिस्तासारखे कोणीही प्रभाव टाकले नाही. आजही त्याना अनुसरणारे पूर्ण जगात बहुसंख्यात आहेत. जात, पंथ आणि धर्म लक्षात न घेता सर्वांनी वाचत असलेले पुस्तक म्हणजे पवित्र बायबल. किती अडथळे आले, हिंसा झाल्या तरी हे पृथ्वी व आकाश नाहीशी होतील पण त्याचे शिक्षण कधीही नाश होणार नाही असे मी म्हणताना जास्त अतिशयोक्ती करत नाही असे वाटते. कारण ते सत्य आहेत.



## 11. सुखभोगी श्रीमंत माणूस आणि भिकारी याचा दृष्टांत.

कोणी एक श्रीमंत मनुष्य होता तो जांभळी व तलम वस्त्रे घालीत असे, आणि दररोज थाटामाटाने ख्यालीकुशाली करत असे, त्याच्या दरवाज्याजवळ फोडानी भरलेला लाजर नावाचा एक दरिद्री माणूस टाकण्यात आला होता. त्या श्रीमंताच्या मेजावरून खाली पडेल त्यावर आपले पोट भरावे अशी त्याची इच्छा असे. शिवाय कुत्री येवून त्याचे फोड चाटीत असे: पुढे असे झाले कि तो दरिद्री माणूस मेला आणि देवदूतांनी त्याला आब्राहमाच्या उराशी नेवून ठेवले, श्रीमंतही मेला व त्यांची उत्तरक्रिया करण्यात आली. तो अधोलोकांत यातना भोगीत असताना त्याने आपली दृष्टी वर करून अब्राहम व त्याच्या उराशी बसलेला लाजर ह्यांना दुरुन पाहिले. तेव्हा त्याने हाक मारून म्हटले, "हे बापा अब्राहम, माझ्यावर दया करून लाजराला पाठिव, ह्यासाठी कि त्याने आपल्या बोटाचे टोक पाण्यात बुडवून माझी जीभ थंड करावी; कारण ह्या जाळात मी क्लेश भोगीत आहे. अब्राहम म्हणाला, "मुला, तू आपल्या आयुष्यात्त आपले सुख भरून पावलास, तसा लाजर आपले दुःख भरून पावला, ह्यांची आठवण कर; आता ह्याला समाधान मिळत आहे व तू क्लेश भोगीत आहेस; एवढेच नव्हे तर जे इकडून तुम्हाकडे जावू पाहतात त्यांस जाता येवू नये व तिकडून कोणी आम्हाकडे येवू नये म्हणून आमच्या व तुमच्यामध्ये मोठी दरी स्थापिलेली आहे." मग तो म्हणाला, "तर बापा, मी विनंती करितो, त्याला माझ्या बापाच्या घरी पाठिव कारण मला पांच भावंडे आहेत त्यांनी तरी ह्यां यातनेच्या स्थळी येवू नयेत, म्हणून त्याने त्यांस इकडची साक्ष ध्यावी." पण अब्राहामाने त्याला म्हटले "त्यांच्याजवळ मोशे व संदेस्टे आहेत, त्यांचे त्यांनी ऐकावे." तो म्हणाला, "हे बापा अब्राहाम, असे नाही; पण मेलेल्यामधून कोणी त्यांच्याकडे गेला तर ते पश्चाताप करतील." तेव्हा त्याने त्याला म्हटले, "ते मोशेचे व संदेष्ट्यांचे ऐकत नसेल तर मेलेल्यामधून कोणी उठले तरी त्यांची खातरी होणार नाही."

(लुक 16:19-31)



## 12. येशू ख्रिस्त कोण? ह्या विषयावर तुमचा निर्णय

प्रिय, बंधू आणि भगिनीनों मागील पानावर मी सांगितल्याप्रमाणे आता प्रभू येशू ख्रिस्त कोण आहे म्हणून तुम्ही निर्णय लावता? तो एक फसवणारा, मानसिक आजारी, किंवा सत्य देव. जर तुम्हीही प्रभू येशू ख्रिस्तांना सत्य देव म्हणून निर्णय लावणारे असाल तर तुम्हीही मुक्ती मिळवू शकता. मुक्ती हे मानवांना त्यांनी जिथे आहेत त्या ठिकाणीच / परिस्थिती मध्ये क्षणात मिळते. त्यासाठी अनेक जन्म घेवून वाट पाहावे लागण्याचे गरज नाही. आणि त्यासाठी आम्ही कोणत्याही प्रकारे देहदंडन, तीर्थयात्रा तसेच आणि कोणतेही कार्य करण्याची गरज नाही. ते जात – पात, स्त्री- पुरुष असे कोणतेही भेदभाव न ठेवता सर्वांना मुक्तपणे मिळते. कारण सर्व माणसांनी मुक्ती मिळवून सत्याच्या ज्ञानापर्यंत पोहचावे हे देवाची इच्छा आहे असे पवित्र शास्त्र सांगते. एक उदाहरण म्हणून वधस्तंभावर येशू संगे खिळवलेले चोर पहा, त्याने एका क्षणातच मुक्ती मिळवली.

**तुमची सुद्धा मुक्ती मिळावी हि इच्छा असेल तर खालील प्रार्थना करा**

"महा कृपाळू प्रभू येशू ख्रिस्ता, तुम्ही आमच्यावर प्रेम करून आम्हाला मुक्ती प्रदान करण्यासाठी 2020 वर्षामागेच ह्या जगात आला होता हे मला समजून घेण्यासारखे केलात म्हणून तुमचा आभारी आहे. मी, एक पापी आहे आणि तुम्ही तर पवित्र असूनही वधस्तंभावर माझ्यासाठी शिक्षा भोगलात. हे माझ्या पापासाठीच म्हणून विश्वास ठेवतो. तुम्ही माझ्यासाठी वधस्तंभावर मरून, पुरले जावून, तिसऱ्या दिवशी मरणावर विजय मिळवून मृत्युंजय म्हणून पुन्हा उठून आलात. हे माझ्या हृदयापासून मी विश्वास ठेवून, तुम्हीच सत्य देव आहात हे माझ्या तोंडाने कबुल करितो. माझे नाव जीवनाच्या पुस्तकात आता लिहिला म्हणून धन्यवाद. आपण परत येवून मला स्वर्गाला घेवून जाणार आहात हे विश्वास बाळगून वाट पाहत आहे. धन्यवाद."

पान. न. 13 वर सांगितल्या प्रमाणे स्वर्गराज्यासाठी आपण योग्य रलात म्हणून आम्ही तुमचे अभिनंदन करतो. आणि तिथे माझी आठवण करा. धन्यवाद.

**ह्या पुस्तीकातील 13 ते 20 धडे, हे वेगवेगळ्या दैनिदिनी मध्ये प्रकाशित झालेले लेख आहेत ते इथे पुनः प्रकाशित करत आहोत.**

दिनांक 25-12-2012 दिवशी शिवमोग्गा जिल्ह्याच्या बातमीपत्रात प्रसिद्ध झालेले लेख (कन्नड)

## 13. येशू देव हा पवित्र देव आहे.

"आम्ही मानवाच्या रुपात आलेले येशू ह्यांनाच देव म्हणून त्यांची आराधना केली पाहिजे. आपण प्रभू येशू ह्यांना सोडून इतर कोणाची देवा सोबत कल्पना करणे हे एक निष्फळ प्रयत्न होय" **– स्वामी विवेकानंद**
(कृतीश्रेणी, प्रवचन सारांश पान न. 331)

**मनुष्यांमध्ये वास केलेले प्रभू येशू ख्रिस्तांचे पवित्रतां बद्दल असलेले पवित्र शास्त्रातील दाखले खालील प्रमाणे.**

- **येशू ख्रिस्तांच्या जन्माबद्दल देवदूतांनी कुमारी मरियेला सांगितलेले असे**
  "पवित्र आत्मा तुझ्यावर येईल; आणि परमेश्वराचे सामर्थ तुझ्यावर छाया करील; ह्या कारणाने ज्याचा जन्म होईल त्याला **पवित्र**, **देवाचा पुत्र**, असे म्हणतील." (लुक 1:35)

- **प्रभू येशू ख्रिस्त पूर्ण मानव म्हणून ह्या जगात साडे 33 वर्ष राहिल्या नंतर**
  सर्व प्रकारच्या मोहाच्या अनुभवातून गेला. तरीही तो पूर्णपणे **निष्पाप** राहिला (इब्री लोकास पत्र 4:15)

- **प्रभू येशू ख्रिस्त त्यांच्याबद्दल शंका घेणाऱ्या लोकांना विचारिले कि**
  "तुमच्यापैकी कोण **मला पापी ठरवितो** ?" (योहान 8:46)



- **पापाचे वेतन मरण आहे:- रक्तासिंचन झाल्याशिवाय पापक्षमा नाही असे सर्व नियमशास्त्र सांगितल्यामुळे आम्ही प्रभू येशू ख्रिस्तामध्ये आम्हाला नीतिमान बनवण्यासाठी**

  ज्याला पाप **ठावूक नव्हते त्याला त्याने** तुमच्या आमच्याकरिता पाप असे केले; ह्यासाठी कि आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे. (2 करिंथ 5: 21)

- **बकरे व वासरे ह्यांच्या रक्ताने आमचे पापक्षमा असाध्य झाल्यामुळे** त्याच्या रक्ताद्वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती **म्हणंजे अपराधांची क्षमा** आपल्याला मिळाली आहे. (इफिस 1:7)

- **प्रभू येशू ख्रिस्त ह्यांचे 12 शिष्यांपैकी एक यहुदा 30 चांदीच्या रुपयांसाठी प्रभूला धरून दिल्यानंतर त्याला पश्चाताप झाला तेव्हा तो दिलेले साक्ष**

  **"**मी निर्दोष जीवाला धरून दिले आहे." (मत्तय 27:4)

- **सभास्थानाच्या अधिकाऱ्यासमोर तपासणी होत असताना** 'मुख्य याजक व सर्व न्यायसभा येशूला जीवे मारण्याकरिता त्याच्याविरुद्ध पुरावा शोधीत होते परंतु तो त्यांना मिळेना. बऱ्याच जणांनी त्याच्याविरुद्ध खोटी साक्ष दिली**, परंतु त्यांच्या साक्षित मेळ बसेना.** (मार्क 14:55,56)

- **पिलाताने सांगितले,** "हा मनुष्य लोकांस फितवनारा म्हणून ह्याला तुम्ही माझ्याकडे आणले; आणि पहा, ज्या गोष्टींचा आरोप तुम्ही ह्याच्यावर ठेवता त्यासंबंधी मी तुमच्यासमक्ष ह्याची चौकशी केल्यावर **मला ह्या मनुष्याकडे काहीही दोष सापडला नाही. हेरोदालाही सापडला नाही."** ( लुक 23:14)

- **पिलाताची पत्नीने बोललेले "**तो न्यायासनावर बसला असता त्याच्या पत्नीने त्यास निरोप पाठविला कि त्या **नीतिमान** मनुष्याच्या बाबतीत

आपण पडू नये: कारण आज स्वप्नात त्याच्यामुळे मला फार यातना झाल्या." (मत्तय 27:19)

- **प्रभू येशू ख्रिस्तां सोबत वधस्तंभावर खिळविलेल्या चोरांपैकी एकाने ख्रिस्ताला बोलत असता दुसऱ्या चोरांनी सांगितले.**
  "आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगित आहो; **परंतु ह्याने कांही अयोग्य केले नाही."** (लुक 23: 41)
- प्रभू येशू ख्रीस्तासंगे वधस्तंभावर खिळविलेले चोरांपैकी एकाने ख्रिस्ताला बोलत असता दुसऱ्या चोरांनी सांगितले.

  **"**आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगित आहो; परंतु ह्याने **कांही अयोग्य केले नाही**." (लुक 23:47)
- **साडे तीन वर्षे येशुबरोबर राहून सेवा केलेले शिष्य पेत्र त्यांच्याबद्धल सांगितलेली साक्ष.** "तुम्ही त्याच्या पावलावर पाउल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्यासाठी कित्ता घालून दिला आहे; **त्याने पाप केले नाही** आणि **त्याच्या मुखात कपट आडळले नाही**; त्याची निंदा होत असता त्याने उलट निंदा केली नाही." (1पेत्र 2: 21-22)

प्रभू येशू ख्रिस्त त्यांच्या जन्मामध्ये, जीवनामध्ये, मरणामध्ये आणि पुनरुत्थाना मध्ये परिपूर्णपणे पवित्रच राहिले. आतापर्यंत त्यांच्यामधील एकही चूक कोणी काढू शकले नाहीत. देव म्हणजे असेच पाहिजे होय न? त्याची तुलना इतरांशी होऊ शकेल का!

प्रभू येशू ह्यांना माझा नमस्कार.



[दिनांक 17-03-2013 दिवशी संयुक्त कर्नाटक वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध झालेले लेख.]

## 14. येशू ख्रिस्तांचा डोंगरावरील प्रवाचानाचा सारांश.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी ह्यांनी '**माझे सत्याचे प्रयोग**' ह्या पुस्तकामध्ये असे नमूद केले आहे, कि त्यांनी **पवित्र शास्त्र** वाचत असता प्रभू येशू ख्रिस्तांनी केलेले डोंगरावरील प्रवचन त्यांच्या हृदयाला ठसले म्हणे. "हे जी शिक्षण आहे ते फक्त ख्रिस्ती लोकांसाठी नाही, तर प्रत्येक व्यक्तिंसाठी आहे आज प्रत्येकाला त्यांची गरज आहेत."

महात्मा गांधीजी ह्यांचे अहिंसा मार्गासाठी आणि आदर्श जीवनासाठी, प्रेरणा असेलेले हे येशू ख्रिस्तांचे 'डोंगरावरील प्रवचनाचे' सारांश खालील प्रमाणे.

### प्रभू येशू ख्रिस्ताने जसे शिक्षण दिले तसेच ते जगून हि दाखविले.

**कोण धन्य आहेत आणि त्यांना काय मिळते**

**जे आत्म्याने दिन ते धन्य कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.**

**जे शोक करीत आहेत ते धन्य कारण त्यांचे सांत्वन करण्यात येईल,**

**जे सौम्य ते धन्य कारण ते पृथ्वीचे वतन भोगतील.**

**जे नितीमात्वाचे भुकेले व तान्हेले ते धन्य, कारण ते तृप्त होतील.**

**जे दयाळू ते धन्य कारण त्यांच्यावर दया होईल.**

**जे अंतकाराणाचे शुद्ध ते धन्य कारण ते देवाला पाहतील.**

**नितीमत्वा करीता ज्यांचा छळ झाला आहे ते**

**धन्य कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.**

**माणसाचे जीवन कसे असावे**

## येशूने जे उपदेश केले ते आचरणात आणले

- तुम्ही पृथ्वीचे मीठ आहा.; पण जर मिठाचा खारटपणाच गेला तर तो खारटपणा त्याला कशाने आणता येईल? पुढे ते बाहेर फेकले जाऊन माणसांच्या पायाखाली तुडविले जाण्यापलीकडे त्याचा काहीच उपयोग नाही.
- तुम्ही जगाचा प्रकाश आहा; डोंगरावर वसलेले नगर लपू शकत नाही दिवा लावून मापाखाली ठेवीत नसतात दिवठणीवर ठेवतात. म्हणजे तो घरातल्या सर्वांना प्रकाश देतो; त्याप्रमाणे तुमचा प्रकाश लोकासमोर असा पडू द्या कि त्यांनी तुमची सत्कर्मे पाहून तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करावे.
- तुझा उजवा डोळा तुला पापास प्रवृत्त करीत असेल तर तो उपटून टाकून दे; कारण तुझे संपूर्ण शरीर नरकात टाकले जावे ह्यापेक्षा तुझ्या एका अवयवाचा नाश व्हावा हे तूझ्या हिताचे आहे.
- दुष्टाला अडवू नका. वाटेवर तुझा वैरी तुझ्याबरोबर आहे तोंच त्याच्याशी सलोखा कर; नाहीतर कदाचित वैरी तुलां न्याधीशाच्या हाती देईल. आणि तू तुरुंगात पडशील. एकाने तुझ्या उजव्या गालावर मारले तर दुसरा गाल हि पुढे कर.
- जो तुझाजवळ काही मागील त्याला ते दे जो तुझ्यापासुन उसने घेवू पाहतो त्याला पाठमोरा होवू नको.
- तुम्ही आपल्या वैऱ्यावर प्रीती करा आणि जे तूमचा छळ करितात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. अशासाठी कि तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे.
- जे तुमच्यावर प्रीती करीतात त्यांच्यावर तुम्ही प्रीती केली तर तूमचे प्रतीफळ काय? अनितीमानही तसेच करीतात न? कारण देव वाईटावर आणि चागल्यावर आपला सूर्य उगवितो. आणि पाऊस पाडीतो.



- तुम्ही जेव्हा जेव्हा दानधर्म करीता तेव्हा लोकांनी आपला गौरव करावा म्हणून करू नका. त्यामुळे तुम्हाला देवापासून फळ मिळणार नाही. तुमच्या उजवा हाताने केलेले दान तुझ्या डाव्या हाताला कळू नये. आणि प्रार्थना करीत असता आपल्या खोलीत जां व दार लावून घेवून प्रार्थना कर. पृथ्वीवर आपल्यासाठी संपत्ती साठवू नका; तर स्वर्गात आपल्यासाठी संपत्ती साठवा. तिथे ते नाश पावत नाही कारण जिथे तुझे धन आहे तेथे तुझे मनही लागेल.
- कोणीही दोन धन्यांची सेवा करू शकत नाही. तुम्ही देवाची आणि धनाची सेवा करू शकत नाही गुरुपेक्षा शिष्य मोठा नाही, परिपूर्ण झालेला शिष्य त्याच्या गुरु सारखाच असेल.
- जर उपकार करणे तुझ्याकडून शक्य असल्यास ते माघार घेवू नकोस. देणे जर तुझ्याकडे आहे तेव्हा तू तुझ्या शेजाऱ्याला 'उद्या ये' असे म्हणू नको.
- तुझ्या शेजाऱ्याचे वाईट चिंतू नको, तो तुझा शेजारी विश्वासाने जगत आहे.
- कोणी तुम्हाला भोजनास बोलाविले असता पहिल्या पंक्तीमध्ये जावून बसू नको, जर बोलाविलेल्यांपैकी तुझ्यापेक्षा मोठी व्यक्ती जर आली तर त्याच्यासाठी जागा द्या असे तुम्हाला सांगितले तर तुला लाजेने शेवटच्या ठिकाणी जावून बसावे लागेल. त्या उलट तुला कोणी भोजनास बोलाविले तर तू शेवटच्या स्थानामध्ये जावून बस; तेव्हा बोलाविलेला येवून तुला पाहून "इथे वर येवून बैस." असे स्वतः बोलावेल तेव्हा सोबत बसलेल्यांसमोर तुला मान मिळेल. स्वतःला उंच करणारा प्रत्येक नमविला जाईल, आणि जो कोणी आपणाला नमवितो त्याला उंच करण्यात येईल.
- तुंम्ही कोणाचे दोष काढू नका, म्हणजे तुमचे दोष कोणी काढणार नाही. आंधळ्याला आंधळाच वाट दाखवू शकेल काय? तर दोघेही खाचेंत पडतील कि नाही? अरे ढोंगी, पहिल्याने स्वतःच्या डोल्यातीले मुसळ काढून टाक, म्हणजे तुझ्या भावाच्या डोळ्यातले कुसळ काढण्यास तुला स्पष्ट दिसेल.

- इतरांना सोडवा म्हणजे तुम्हालाही सोडवण्यात येईल. द्या म्हणजे तुम्हाला हि देण्यात येईल. लोकांनी तुमच्याशी कसे वर्तन करावे अशी तुमची इच्छा आहे तसे तुम्ही त्यांच्याशी वर्तन करा.
- मला प्रभुजी प्रभूजी असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात प्रवेश होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल. ह्यास्तव जो प्रत्येक जण हि माझी वचने ऐकून त्याप्रमाणे वागतो तो कोणा एका सुज्ञ मनुष्यासारखा ठरेल; त्याने आपले घर खडकावर बांधले.
- चिंता करून आपल्या आयुष्याची दोरी हातभर वाढवावयास तुमच्यापैकी कोण समर्थ आहे? तुमच्या गराजाविषयी पिता जाणून आहे. आकाशातील पाखराकडे निरखून पहा; ती पेरणी करीत नाहित. कापणी करीत नाहीत कि कोठारांत साठवीत नाहीत तरी तुमचा स्वर्गीय पिता त्यांना खावावयास देतो; तुम्ही त्यापेक्षा श्रेष्ठ आहात कि नाही? म्हणून तुम्ही पाहिल्याने त्याचे राज्य व नितीमत्व मिळवण्यास झटा म्हणजे त्याच्याबरोबर सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील.

## आम्ही प्रार्थना कसे करावे?

"हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानिले जावो. तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवर ही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो आमची रोजची भाकर आज आम्हास दे. आणि जसे आम्ही आपल्या ऋण्यास ऋण सोडिले आहे तशी तू आमची ऋणे आम्हास सोड. आणि आम्हास परिक्षेत आणू नको; तर आम्हास वाईटापासून सोडीव कारण कि राज्य, सामर्थ्य आणि गौरव हि सर्वकाळ तुझीच आहेत;" "आमेन."



[दिनांक 02-04-2013 रोजी शिवमोग्गा शहराच्या पावन ह्या पत्रामध्ये पसिद्ध झालेले लेख.]

## 15. प्रभू येशू ख्रिस्तांनी केलेले 37 चमत्कार.

प्रभू येशू ख्रिस्त हे अंदाजे 2023 वर्षा पूर्वी ह्या भूमीवर जन्म घेवून साडे 33 वर्षे मनुष्यामध्ये राहिले. त्यांच्या साडे तीन वर्षाच्या सेवेमध्ये त्यांनी केलेल्या प्रमुख चमत्कारांपैकी 37 चमत्कार पवित्र शात्रामध्ये दाखल झाले असून ते खालिल प्रमाणे आहेत.

1. काना ह्या गावी लग्नामध्ये द्राक्षरसाची कमतरता भासल्यावर प्रभू येशू तिथे दोन तीन मण पाणी मावणारे सहा रांजण होते. त्यातील पाण्याचे द्रक्षरस करून तेथील गरज भागवली. (योहान 2:1-11)
2. काना गावच्या राजवाड्याच्या प्रमुख व्यक्तीचा मुलगा आजारी असता प्रभू येशू म्हणाले कि "तुझा मुलगा वाचला आहे जा" त्या क्षणीच त्या मुलाचा ताप त्याला सोडून गेला होता. (योहान 4:43-54)
3. सभास्थानातील एका मनुष्याच्या आत राहणाऱ्या भुताने त्यांना पाहताक्षणीच "देवाचे अभिषिक्त तो तूच, आम्हाला नाश करण्यासाठी येथे आलास काय?" असे ओरडले. तेव्हा प्रभू येशू त्याला धमकावून "ह्या माणसाला सोडून जा" असे म्हणाले. तेव्हा ते भूत त्या माणसाला काही इजा न पोहचता सोडून गेले. (लुक 4:31-16)
4. प्रभू येशू ख्रिस्त पेत्राच्या सासऱ्याच्या घरी आले आसता त्याची सासू तापाने फणफणत होती. प्रभू तिच्या हाताला स्पर्श करताच तिचा ताप तिला सोडून गेला. (मतय 8:14-15)
5. त्या दिवशी सायंकाळी भूतग्रस्त आणि आजारी ह्यामधून अनेकाना प्रभू येशूने बरे केले. (मत्तय 8:16-17)
6. पेत्र एक मासे धरणारा होता तो रात्रभर प्रयास करून एकही मासा पकडू शकला नव्हता. तेव्हा प्रभू येशू त्याच्या बोटीमध्ये उभा राहू जमलेल्या

लोकाना उपदेश केल्या नंतर प्रभूच्या सांगण्यावरून पेत्राने जाळी सुमुद्रात टाकली व थव्यांचे थवे मासे त्याला मिळाले. (लुक 5:1-6)

7. कुष्ठरोगाने भरलेला एक माणूस प्रभू ख्रिस्तांना दंडवत घालून "प्रभू तुझी इच्छा असल्यास मला शुद्ध करू शकता" असे विंनती केला, तेव्हा ख्रिस्ताने "माझी इच्छा आहे, शुद्ध हो" असे आज्ञा दिले. तत्क्षणीच कुष्ठ जावून तो पूर्ण बरा झाला. (लुक 5:12-13)

8. एक शताधीपती ख्रिस्तांच्या जवळ येवून म्हणाला कि "प्रभू माझा एक चाकर अजारी आहे; आपण माझ्या घरी यावे ही माझी योग्यता नाही म्हणून आपण एक शब्द मात्र बोला माझा चाकर बरा होईल" तेव्हा प्रभू ख्रिस्त "तुझा म्हणण्याप्रमाणे होवो." असे सांगितले तेव्हाच तो चाकर बरा झाला. (मत्तय 8:5-13)

9. प्रभू ख्रिस्त त्याच्याजवळ आणलेल्या एक अर्धांगवायू रोग्याला पाहून म्हणाले कि "तुझे अंथरूण उचलून घेवून उठून चालत जा." तेव्हा तो मनुष्य उठून आपली बाज उचलून घेवून चालू लागला. (मत्तय 9:2-8)

10. प्रभू ख्रिस्त हात वाळलेल्या एका मनुष्यला पाहून "तुझा हात इकडे कर." असे सांगितले आणि तो हात लांब केला तेव्हाच त्याचे हात पूर्णपणे बरे झाले. (मार्क 3:1-6)

11. एका विधवां बाईचा एकुलता एक मुलगा मरण पावल्यावर त्या विधवेला पाहून प्रभू दयेने "हे तरूणा उठ;" असे बोलले. तसे म्हणत असतानाच तो मेलेला मुलगा जिवंत झाला व उठून बोलू लागला. (लुक 7:11-17)

12. एकदा समुद्रामध्ये मोठे वादळ उठून शिष्यांची होडी बुडण्याच्या स्थितीमध्ये असताना शिष्य येवून प्रभूला ओरडून म्हणाले कि "गुरुजी आम्हाला वाचवा" तेव्हा ख्रिस्त उठून वाऱ्याला धमकावले आणि समुद्राला म्हणाले कि "उगा रहा" त्या क्षणातच सर्व काही शांत झाले. (मार्क 4:35-41)



13. गनेसरेत प्रांतामध्ये अंदाजे 2000 भूते पछाडलेला एक क्रूर माणूस प्रभू येशू ख्रिस्तांना दंडवत घालून म्हणाला कि "हे परात्पर देवाच्या पुत्रा, आम्हाला छळू नको." तेव्हा प्रभू येशू त्यांना "अरे भूतानो ह्याला सोडून जा अशी आज्ञा दिले. तेव्हा ते भुते त्याला सोडून गेले व तो माणूस शुद्धीवर आला." (मार्क 5:1-20)

14. बारा वर्षे रक्तस्रावाने पिडीत एक महिला येवून "मी प्रभू येशू ख्रिस्तांच्या कपड्याच्या गोंड्याला शिवले तरी बरी होईन." असे म्हणत मागून येवून त्याच्या वस्त्राच्या गोंड्याला शिवली, त्याक्षणीच तिचा रक्तस्राव थांबला. (मार्क 5:25-34)

15. याईर नावाच्या एका अधिकाऱ्याची मुलगी अजारी असताना तो प्रभू येशू जवळ येवून पहोचेपर्यंत ती मुलगी मरून गेली. प्रभू त्याच्या घरी जावून त्या मेलेल्या मुलीला "थालीता कुम" (म्हणजे मुली तुला सांगतो उठ) असे म्हणाले. त्यावेळीच ती मुलगी उठून बसली व चालू लागली. (मार्क 5:35-45)

16. दोन आंधळे "हे प्रभू येशू आम्हावर दया करा." असे आरोळी मारिले ख्रिस्तांनी त्यांच्या डोळ्याना स्पर्श केले व म्हणाले कि "तुमच्या विश्वासाप्रमाणे तुम्हास होवू दे." तेव्हाच त्याच्या डोळ्याना दिसू लागले. (मत्तय 9:27-30)



17. एका भूतग्रस्त मुक्याला येशू कडे आणिले. प्रभू येशू त्याच्यामधील भुताला काढल्यावर तो मुका बोलू लागला. (मत्तय 9:32-34)

18. बेथेसदा नावाच्या एका तलावाजवळ 38 वर्षे आजारी असणारा एक माणूस पडून होता. त्याला पाहून प्रभू येशूने म्हटले "तुला बरे होण्याची इच्छा आहे काय?" असे विचारले. तो होय म्हणताच "उठ व तुझी बाज घेवून चालू लाग." अशी आज्ञा दिली. लागलेच तो माणूस बरा होवून आपली बाज उचलून चालू लागला. (योहान 5:1-9)

19. प्रभूचे उपदेश ऐकण्यासाठी आलेले पाच हजार (पुरुष मात्र) लोकांना (म्हणजे अंदाजे एकून 20,000 माणसे) ह्या सर्वांना फक्त पाच भाकरी आणि दोन मासे ह्यामधून देवाची स्तुती करून वाढले व सर्व जण खावून तृप्त झाल्यावर 12 टोपली तुकडे उरले. (मत्तय 14:13-21)

20. प्रभूचे शिष्य प्रवास करीत असलेले होडी रात्री चौथ्या प्रहारास जमिनीपासून फार लांब गेल्यावर वादळामध्ये सापडले. तेव्हा प्रभू येशू अजून जमिनीवरच होते, मग त्यांनी पाण्यावर चालत जावून त्यांच्या शिष्यांच्या होडीमध्ये बसल्यावर सर्व काही शांत झाले. मग सगळे जण सुरक्षित पलीकडे जावून पोहचले. (मत्तय 14:22-33)

21. प्रभू येशू ख्रिस्त पलीकडच्या तीरावर पोहचल्यावर त्या गावातील लोकांनी ओळख धरून त्या प्रदेशात सर्वाना सांगावा पाठवून जे आजारी होते त्या सर्वांना बोलाविले आणि विनंती केली कि "आपल्या वस्त्राच्या गोंड्याला तरी शिवू द्या" जे जे त्याच्या वस्त्राला स्पर्श केले ते सर्व बरे झाले. (मत्तय 14:34-36)

22. प्रभू येशू ख्रिस्त एका घरात उतरले असता यहुदितर एक स्त्री त्याच्या पायावर पडून "माझ्या मुलीला भूत लागले आहे, तिला सोडवावे असे विनंती केली. तेव्हा येशूने सांगितले कि भूत तिला सोडून गेले आहे जा." ती घरी जावून पहिले तर भूत तिच्या मुलीला सोडून गेले होते. (मार्क 7:24-30)

23. गलीलच्या एका गावात बोबडे बोलणारा एका बहिऱ्या माणसाला येशू ख्रिस्ताजवळ आणिले. तेव्हा ते त्याच्या कानात बोटे घालून; त्याच्या जिभेला स्पर्श करून आकाशाकडे पाहून "एफ्फाथा" (उघडू दे) असे म्हणताच त्याचे कान उघडले; जिभेचा बंध तुटला. आणि तो स्पष्टपणे बोलू लागला. (मार्क 7:31-35)

24. अरण्यामध्ये तीन दिवस आपले उपदेश ऐकत असणाऱ्या 4000 फक्त पुरूषच असलेल्या एका समूहाला पाहून त्यांच्यावर येशुना दया आली व ह्यांना असेच परत पाठवले तर थकून जातील म्हणून त्यांच्याजवळ असलेले फक्त 7 भाकरी आणि काही लहान मासे ह्यांनाच देवाची स्तुती करून मोडून दिले, सगळे जण जेवून तृप्त झाल्यावर उरलेले तुकडे गोळा केले असता 7 टोपले भरले. (मत्तय 15:32-39)

25. बेतसैदा नावाच्या गावातील एका आंधळ्याला पाहून त्याच्या डोळ्यामध्ये थुंकून त्याच्या वर हात ठेविले तेव्हा त्याला सर्व काही स्पष्टपणे दिसू लागले. (मार्क 8:22-26)

26. प्रभू येशू ख्रिस्त वाटेवर जाताना एका जन्मांध माणसाला पाहिले जमिनीवर थुंकून त्याचा चिखल बनवून ते त्याच्या डोळ्याला लावले आणि म्हणाले "शीलोह तलावात जावून धु." तो तिथे जावून डोळे धुतला आणि डोळस बनून आला. (योहान 9:1-7)

27. एकदा एक माणूस येशू ख्रिस्तांच्या जवळ येवून गुडघे टेकून म्हणाला कि "प्रभू माझ्या मुलावर दया करा. तो फेफरेकरी असून त्याचे हाल होतात. तो वारंवार विस्तवात पडतो व वारंवार पाण्यात पडतो." तेंव्हा ख्रिस्ताने भुताला दटाविले, तेंव्हा ते त्यातून निघून गेले आणि त्याच घटकेपासून मुलगा बरा झाला. (मत्तय 17:14-21)

28. येशू ख्रिस्ताने आपला शिष्य पेत्राला- "तू जाऊन समुद्रात गळ टाक आणि पहिल्याने वर येईल तो मासा धरून त्याचे तोंड उघड म्हणजे तुला दोन रुपयांचे नाणे सापडेल. ते घेऊन माझ्याबद्दल व तुझ्याबद्दल त्यांना दे." असे म्हंटले. तसे झाले. (मत्तय 17:24-27)

29. मग आंधळा व मुका असलेल्या एका भूतग्रस्ताला त्याच्याकडे आणिले; आणि त्याने त्याला बरे केले, तेंव्हा तो मुका बोलू व पाहू लागला. (मत्तय 12:22)

30. तेव्हा पहा, अठरा वर्षे विकाराचा आत्मा लागलेली एक स्त्री तेथे होती; ती कुबडी असल्यामुळे तिला नीट उभे राहता येत नव्हते. येशूने तिला पाहून बोलवले व म्हटले, "बाई, तू आपल्या विकारापासून मुक्त झाली आहेस." त्याने तिच्यावर हात ठेवताच ती सरळ झाली व देवाची महिमा वर्णू लागली. (लूक 13:10-13)

31. आणि पाहा जलोदर झालेला कोणी एक माणूस येशू ख्रिस्ताच्यासमोर होता. त्याने त्याला जवळ घेऊन बरे केले व जाऊ दिले. (लूक 14:1-4)

32. येशू ख्रिस्त एका गावात जात असता कुष्ठरोग असलेले दहा पुरुष त्याला भेटावयास आले. ते दूर उभे राहून मोठमोठयाने ओरडून म्हणाले, "अहो येशू, गुरुजी, आम्हांवर दया करा". त्याने त्यांना पाहून म्हटले, "तुम्ही जाऊन स्वत:स याजकांना दाखवा." मग असे झाले की, ते जाता जाता शुध्द झाले. (लूक 17:11-19)

33. येशू ख्रिस्ताला प्रिय असलेला लाजर चार दिवसापूर्वी मरण पावला होता. त्याची बहिण रडत असलेले पाहून प्रभू येशू आत्म्यात खवळला व वीव्हळ झाला. तसेच तो कबरेकडे आला, तेथे गुहाच्या तोंडावरील धोंड काढवून, प्रार्थना करुन,मोठयाने म्हणाला "लाजरा, बाहेर ये." असे म्हटले, तेव्हा मेलेला लाजर जिवंत होवून बाहेर आला. (योहान 11:1-44)

34. यरीहोच्या वाटेवर एक बर्तीमय नावाचा आंधळा भिकारी, प्रभू येशूला- "येशू, माझ्यावर दया कर," असे ओरडले. येशू त्याला म्हणाला, "मी तुझ्यासाठी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?" आंधळा त्याला म्हणाला, "गुरुजी मला दृष्टी प्राप्त व्हावी." येशू त्याला म्हणाला, "जा, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे." तेव्हा लागलीच त्याला दृष्टी आली. (मार्क 10:46-52)

35. मग सकाळी तो परत नगरास येत असता त्याला भूक लागली. आणि वाटेवर अंजिराचे एक झाड होते ते पाहून तो त्याच्याजवळ गेला; पण पानांशिवाय



त्याला त्यावर काही मिळाले नाही; मग तो त्या झाडाला म्हणाला कि, "ह्यापुढे तुझे फळ कधी न येवो;" आणि ते अंजिराचे झाड ताबडतोब वाळून गेले. (मत्तय 21:18-19)

36. येशू ख्रिस्ताला वधस्तंभावर खिळवण्यासाठी पकडायला आलेल्या शिपायातील मल्ख नावाच्या एका शिपायाचा कान पेत्राने तलवारीने कापला तेंव्हा येशूने पेत्राला बोलले की; "आपली तलवार म्यानात घाल, तलवार धरणारे तलवारीने मरतील." आणि त्याने त्याच्या कानाला स्पर्श करून बरे केले. (लुक 22:47-51)

37. येशू ख्रिस्ताला वधस्तंभावार खिळल्यानंतर त्यांचे शिष्य ख्रिस्ताचे शिक्षण व उपदेश प्रसार करणे सोडून त्यांनी मासेमारी जो त्यांचे पारंपारिक व्यवसाय होता त्याच्या साठी ते माघारे जातात तेव्हा त्या दिवशी त्यांनी एकही मासा पकडला नाही. पाहट झाल्यावर पुनरुत्थान पावलेला प्रभू येशू ख्रिस्त त्यांच्यासमोर प्रगट झाले व म्हणाले "मुलानो तुम्हाला खाण्यासाठी काही नाही का? होडीच्या उजव्या बाजूला जाळे टाका." आणि ते तसेच जाळी टाकल्यावर त्यांना जाळी ओढता येईना एवढे मासे मिळाले. (योहान 21:1-6)

एवढेच नाहीतर प्रभू येशूने केलेले चमत्कार फार आहेत. ते सर्व एकेक लिहित गेले तर ते पुस्तक जगात मावणार नाही. (योहान 21:25)

प्रभू येशूने सांगितले – "मी तुम्हाला खचित सांगतो. माझ्यावर विश्वास ठेवणारा प्रत्येक व्यक्ती मी करत असलेले कामे तोही करतील. किंबहुना अधिक करतील. तेवढेच नाही तर तुम्ही माझ्या नावाने जे काही मागाल ते सर्व मी पूर्ण करीन" (योहान 14:12-14)

**परमेश्वर महणजे सर्वशक्तिमान,सर्वव्यापी, सर्वज्ञानी असले पाहिजे. आणि त्यांना काहीही असाध्य असू नये. प्रभू येशू ख्रिस्त सर्व प्रकारचे चमत्कार केलेले आहेत त्यांना कोणतेही कार्य अशक्य नव्हतेच. कारण ते देवच होते. त्याना एक नमस्कार अर्पण करू या.**

~*~*~*~*~*~

[दिनांक 04-04-2013 दिवशी विजय कर्नाटक ह्या दैनिक बातामिपात्रामध्ये कर्नाटक राज्यभर प्रकट झालेले लेख]

## 16. व्यभिचारामध्ये सापडलेल्या एका स्त्रीचा न्याय करण्यासाठी तिला येशूसमोर सादर केले असताना.

"तुम्हाला मुक्ती हवी असल्यास येशुचीच आराधना करा. हे तुम्ही कल्पना करण्या व देवाच्या भावेनेपेक्षा श्रेष्ठ आहे. त्याची तुम्ही देव म्हणूनच पूजा करा. त्याला कोणी मानव मानले, तर ते ईश्वराची निंदा होईल."

**– स्वामी विवेकानंद**

(कृती श्रेणी, संपुट – 7 प्रवचन सारांश पान. न. 311)



प्रभू येशू ख्रिस्त मंदिरामध्ये बसले असता शास्त्री आणि परुशी ह्यांनी व्याभिचारामध्ये सापडलेल्या एका स्त्रीला धरून आणले. व मध्ये उभे केले. व म्हणाले "गुरुजी हि स्त्री व्यभिचार करत असताना रंगेहात सापडली आहे. असल्या



स्त्रीला दगडाने ठेचून मारावे असे मोशेने आपल्या नियमशास्त्र आज्ञा दिली आहे. हिच्याविषयी आपण काय म्हणता?" त्याच्यावर दोष लावावयाला काही तरी मिळावे म्हणून त्याची परिक्षा पाहण्याकरिता असे म्हणाले. येशू तर खाली ओणवून बोटाने जमिनीवर लिहू लागला; आणि ते त्याला एक सारखे विचारीत असता तो उठून त्यांना म्हणाला. **"तुम्हामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा."** हे शब्द ऐकून वृद्धापासून तो थेट शेवटल्या माणसापर्यंत ते सर्व, स्वतःसुध्दा पापी आहेत हे समजून घेवून, एका मागून एक सगळेच निघून गेले. तिथे फक्त प्रभू येशू एकटेच राहिले. आणि ती स्त्री तिथेच उभी होती. येशू उठून तिला म्हणाले "बाई तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरविला नाही काय?" ती म्हणाली "प्रभुजी कोणी नाही." तेव्हा येशू तिला म्हणाले "मीही तुला दंड ठरवीत नाही जां; ह्यापुढे पाप करू नको." (योहान 8: 1-11)

## जर त्या परुश्यामध्ये तुम्ही असता तर त्या स्त्रीला दगड मारला असता काय?

प्रभू ख्रिस्त त्या स्त्रीला दगड मारू शकले असते कारण ते पूर्णपणे पवित्र होते. 'त्यांनी कोणतेही पाप केले नाही. त्याच्या तोंडात असत्य आढळले नाही', असे पवित्र शास्त्र सांगते. पण परमेश्वराने प्रभू येशू ख्रिस्ताना जगाच्या तारणासाठी (सर्व मानवांना मोक्ष प्राप्ती व्हावे म्हणून) पाठविले, विनः न्याय करण्यासाठी नाही. ख्रिस्त दुष्टांचा संहार करून शिष्टांचा परिपालन करण्यासाठी नाही, तर हरवलेल्याना (पापी माणसांना) शोधावयास आणि तारावयास आला आहे.

स्वर्ग राज्यामध्ये कोणत्याही निषिद्ध गोष्टी आणि अमंगळपणा असत्य आचरणारा इसम ह्यांचा प्रवेश होणारच नाही. तर 'मी पापी आहे; माझ्या पापांसाठी प्रभू येशू ख्रिस्त वधस्तंभावर शिक्षा भोगिले आहे.' ह्या सत्यावर विश्वास ठेवतो,, येशूच्या रक्ताने मिळणारी पापापासून मुक्ती मिळवला आहे, अशा लोकांचे, म्हणजे मोक्षप्राप्ती मिळवलेल्यांचे यादीत ज्यांचे नावे नोंद झाले आहे, त्या लोकांचा मात्र प्रवेश होईल. (प्रकटीकरण 21:27)

परमेश्वर दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, पण अपराधी जणांची मुळीच गय न करणारा देव आहे. कारण तो नीतिमान न्यायाधीश आहे. (निर्गम 34:6,)

पवित्र शास्त्र सांगते कि माणसाचे विचार त्याच्या लहानपणापासूनच दुष्ट असतात. नीतिमान कोणी नाही, एकही नाही, सगळे जण पाप करून देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत. (रोम 3:11 आणि 23)

"जो आपले दोष झाकितो त्याचे बरे होत नाही तर ते कबुल रून सोडून देतो त्यावर दया होते." (नीती 28:13)

प्रभू येशू ख्रिस्त आमचे पाप हरण करणारे यज्ञाचे कोकरू आहेत. आमचे पापे मात्र नाहीतर सर्व जगाचे पाप हरण करिते. (1योहान 2:2)

"येशु ख्रिस्तांचे रक्त आमचे सर्व पापे नाहीशे करून आम्हाला शुद्ध करिते. आमच्या ठायी पाप नाही असे म्हणालो तर आम्ही स्वतःला फसवीत आहोत. आणि सत्य आमच्या ठायी नाही, जर आम्ही आमची पापे काबुल करून सोडून दिले, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून येशू ख्रिस्त विश्वासू आणि नीतिमान असल्या कारणाने सर्व अनितीपासून आम्हाला शुद्ध करील व सर्व अन्यायापासून सोडवील." (1 योहान 1: 7-9)

पापाचे वेतन मरण (नित्य नरक) रक्त सिंचन नाही तर पाप क्षमा नाही. असे सर्व धर्म शास्त्र व नियम शास्त्र सांगतात. बैल व बकऱ्याच्या रक्ताने आमचे पाप क्षमा होणे अशक्य असताना, ह्या व्यभिचारी स्त्रीची पापे आणि आम्हा सर्वांचे पापे देवाने प्रभू येशू ख्रिस्तावर लादले. ख्रिस्त आमच्या पापाना क्षमा करून आपल्या विरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकूल असलेले विधींचे ऋणपत्र त्याने खोडले व वधस्तन्भाला खिळून त्याने ते रद्द केले. (कलसै 2:24)

पवित्र आणि परिपूर्ण असणारा ख्रिस्त यज्ञाचे बळी कोकरू स्वतः होवून स्वत:चे रक्त घेवून एकदाच आपले देह समर्पण करून सर्व कुळ, भाषा व प्रजा ह्यांना देवासाठी विकत घेतला आणि म्हणाला "समाप्त झाले." देवाच्या इच्छेनुसार



यज्ञ झाल्याने देवाच्या इच्छा येशू पूर्ण केल्याने आम्ही शुद्ध झालो आहोत. आमच्या अपराधामुळे तो घायाळ झाला आमच्या दुष्कार्मामुळे तो ठेचला गेला; आम्हास शांती देणारी अशी शिक्षा त्यास झाली;

(इब्री लोकास पत्र 9 आणि 10 अध्याये याशाया 53: 5-6)

त्याने स्वतः तुमची आमची पापे स्वदेही वाहून खांबावर नेली, ह्यासाठी कि, आपण पापाला मेलेले होवून, सदचारासाठी जगावे. त्याला बसलेल्या फटक्याने तुम्ही निरोगी झाला आहां| (1पेत्र 2:21)

देवाची अशी इच्छा आहे कि, सर्व माणसांचे तारण व्हावे व त्यांनी सर्व परिपूर्ण ज्ञानापर्यंत पोहोचावे. कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यामध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकाच मध्यस्थ आहे. त्याने सर्वांसाठी मुक्तीचे मोल म्हणून स्वतःला दिले आहे| (1तीमथी 2: 4-5)

## आम्हाला पापापासुन सुटका मिळवून, नरक वगळून, स्वर्गात प्रवेश करण्यासाठी काय केले पाहिजे?

प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा, तेव्हा तुम्ही मुक्ती मोक्ष पावाल. तुमच्या घरातील सर्वही मुक्ती पावतील. ते म्हणजे तुम्ही प्रभू येशूच खरोखर प्रभू आहे असे मुखाने कबुल केलात व देवाने त्याला मेलेल्यातून उठविले आहे असे हृदयात विश्वास ठेवला तर तुम्हाला मोक्षप्राप्ती होईल. येशू ख्रिस्तावर विस्वास ठेवणाऱ्याची अशाभंग होणार नाही. 'येशू ख्रिस्ताचे नाव घेणार्या सर्वांचा तारण (मोक्ष प्राप्ती) होईल' (प्रेषितांचे कृत्ये 16:31; रोम 10: 9-13)

[दिनांक 24-03-2013 रोजी उदयवाणी आणि 24/05/2013 दिवशी प्रजावाणी ह्या दिनपात्रिकेत प्रसिध्द झालेलं लेख.]

## 17. मरणानंतर काय? या प्रश्नाला पवित्र शास्त्रामध्ये स्पष्ट उत्तर आहे.

"प्रत्यक्ष देवाचे दर्शन कोणालाही, कोणत्याही काळात, देवाच्या पुत्राखेरीज, झाले नाही. असे प्रभू येशू बोलले आहेत, हे खरे आहे. देवाच्या पुत्राला सोडून आम्ही कोठे देवाला पाहता येते का? " **-स्वामी विवेकानंद**

(कृती श्रेणी, स्प्पुत 7 पान. न. 53)

जगाचा शेवट होवो अगर न होवो, आम्हाला तर ह्या जगाचा एक दिवस निरोप घेणे आहेच. म्हणून 'मी कोण, मेल्यानंतर कोठे जाईन?' ह्याचे ज्ञान असणे गरजेचे बनते. म्हणून ह्या प्रश्नांचे उत्तरे पवित्र शास्त्र खालील प्रमाणे देते.

## पृथ्वी व आकाश ह्यांची निर्मिती आणि मानव पापामध्ये पडलेले.

प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी निर्माण केले. त्या नंतर आपल्या स्वरूपाला अनुरूप असे मातीतून मनुष्य निर्माण केला. व त्याच्या नाकापुड्यात जीवन श्वास फुंकिला तेंव्हा तो जीवधारी प्राणी झाला. त्यानंतर त्याला देवाने गाढ निद्रा आणली, आणि त्याच्या बरकड्यातून एक फासळी काढून त्याचे एक स्त्री बनविली. आणि त्याना एका बागेत ठेविले. त्यांना सुचविले कि त्या बागेतील सर्व फळे यथेच्छ खावू शकता, पण चांगले आणि वाईट ह्याचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खावू नका. अशी आज्ञा दिली. परंतु त्या स्त्रीने देवाच्या आज्ञेचे भंग केले आणि त्या झाडाचे फळ तिने खाल्ले व आपल्या पतीलाहि दिले. आणि त्यानेही ते फळ खाल्ले. त्यांनतर देवाने पहिले कि पृथ्वीवर दुष्टतेची वाढ फारच झाली असून ते माणसे आपल्या मानात जे जे विचार करितात ते केवळ वाईटच असतात हे पाहून, आपण भूमीवर मनुष्याला निर्माण केल्याचा देवाला अनुताप झाला.

(उत्पत्ती 1 ते 6 अध्याये)



## जगाच्या शेवटाचे चिन्हे

"राष्ट्रावर राष्ट्र व राज्यावर राज्य उठेल. आणि जागोजागी दुष्काळ व भूमिकंप होतील; पण ह्या सर्व गोष्टी मध्ये वेदनांचा प्रारंभ होईल. तेव्हा तुमचे हाल करण्याकरीता ते तुम्हास धरून देतील व तुम्हास फटके मारतील. पुष्कळ जण अडखळतील, एकमेकास धरून देतील, व एकमेकांचा द्वेष करितील; पुष्कळ खोटे संदेष्टे उठतील व अनेकांस फसवतील. आणि अनीती वाढल्यामुळे पुष्कळाची प्रीती थंडावेल; परंतु जो शेवटपर्यंत टिकून राहील तोच तरेल. सर्व राष्ट्रास साक्षीसाठी म्हणून राज्याची हि सुवार्ता सर्वत्र गाजविली जाईल, तेव्हा शेवट होईल."

(मत्तय 24: 7-14)

## जगाचा शेवट केव्हा होईल? त्या दिवशी काय घडेल?

"तरी चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल; त्या दिवशी आकाश मोठा नाद करीत नाहीसे होईल. सृष्टीतत्वे तप्त होवून लयास जातील, आणि पृथ्वी व तिच्यावरील गोष्टी उघडकीस येतील." (2 पेत्र 3:10)

**2023 वर्षांच्या पुर्वी प्रभू येशू ख्रिस्तांचे प्रिय शिष्य संत योहान ह्यांनी हे दर्शन पहिले ते खालील प्रमाणे आहे.**

तेव्हा मोठा भूमिकंप झाला; सूर्य तरटासाराखा काळा झाला व सगळा चंद्र रक्तासारखा झाला; अंजिराचे झाड मोठ्या वाऱ्याने हालले म्हणजे त्याची कच्ची फळे जशी खाली पडतात तसे आकाशातील तारे पृथ्वीवर पडले. एखादे पुस्तक गुंडाळावे तसे आकाश गुंडाळले जावून निघून गेले आणि सर्व डोंगर आपआपल्या ठिकाणावरून ढळली. पृथ्वीवरील राजे व मोठे अधिकारी सरादार श्रीमंत व बलवान लोक, सर्व दास व सर्व स्वतंत्र माणसे गुहात व डोंगरातील खडकातून लपली; आणि ते डोंगरास आणि खडकास म्हणाले, आम्हावर पडून राजसनावर जो बसलेला आहे, त्याच्या दृष्टीपुढून आणि कोकर्याच्या क्रोधापासून आम्हास लपवा कारण त्याचा क्रोध मोठा आहे, आणि कोणाच्याने टिकाव धरवेल?

(प्रगटीकरण 6:12-17)

## जगाच्या शेवटास / मरणानंतर आम्हाला काय घडेल?काय घडेल?

एकदाच मरणे नंतर न्यायनिवाडा माणसासाठी नेमले आहे. प्रत्येकाने आपल्या देहाने जे काही केले आहे त्यानुसार, चांगले केल्यास चांगल्यासाठी, वाईट केले असल्यास वाईटासाठी योग्य प्रतिफळ पावण्यास, ख्रिस्तांच्या न्यायासनापुढे प्रगट होणे आहे. तेव्हा पुस्तके उघडण्यात येईल. (इब्री 9:27 & 2 करिंथ 5:10)

### न्यायनिवाडा दोन प्रकारे होणार आहे

1) मोक्षप्राप्ती झालेल्या लोकांच्या नावाचा पुस्तकामध्ये लिहिण्यात आलेल्या गोष्टींच्या आधारावर ते मुकुट व बहुमान पावतील. (प्रगटीकरण 20:12)

2) ज्यांचे नावे जीवनाच्या पुस्तकात लिहिण्यात आले नाहीत त्यांना अग्नीच्या सरोवरात टाकले जाईल. (प्रगटीकरण 20:15)

## परमेश्वराने नरक कोंणासाठी निर्माण केला आहे? आम्हाला काय घडेल?काय घडेल?

न्यायनिवाड्याच्या दिवशी देव डावीकडच्यास म्हणेल, "अहो शापग्रस्तहो, माझ्यापुढून निघा आणि सैतान व त्याचे दूत ह्यांच्यासाठी जो सार्वकालिक अग्नी सिद्ध केला आहे त्यात जा. कारण मी भुकेला होतो, तेव्हा तुम्ही मला खावयास दिले नाही, तान्हेला होतो तेव्हा मला प्यावयास पाणी दिले नाही. परका होतो तेव्हा मला घरात घेतले नाही; उघडा होतो तेव्हा मला कपडे दिले नाही, आजारी व बंदिशाळेत होतो तेव्हा माझ्या भेटीला आला नाही." त्यावेळेस हेही त्याला उत्तर देतील, "प्रभुजी आम्ही केव्हा तुम्हाला भुकेले, तान्हेले, परके उघडे, आजारी किंवा बंदिशाळेत पाहिले आणि तुमची सेवा केली नाही?" तेव्हा तो त्यास उत्तर देईल, मी तुम्हास खचित सांगतो कि ज्याअर्थी ह्या कानिष्ठांपैकि एकाला केले नाही, त्याअर्थी ते मला केले नाही, ते तर सार्वकालिक शिक्षा भोगावयास जातील/ आणि नीतिमान सार्वकालिक जीवन उपभोगावायास जातील. (मत्तय 25: 41-46)



परंतु भेकड विश्वास न ठेवणारे, अमंगळ, खून करणारे, जारकर्मी, चेटकी, मुर्तीपुजक आणि सर्व लबाड माणसे ह्यांच्या वाट्यास अग्नीचे व गंधकाचे सरोवर येईल; हेच ते दुसरे मरण आहे. तिथे त्याचा किडा मरत नाही व अग्नी विझत नाही

(प्रगटीकरण 21:8, मार्क 9:48)



## आम्ही नरकातून निघून स्वर्गात जाण्यासाठी काय करावे लागेल?

1. नंतर पहा एक जण येवून त्याला म्हणाला "गुरुजी, मला सार्वाकालिक जीवन वतन मिळावे म्हणून मी कोणते चांगले काम करावे?" तो त्याला म्हणाला, "मला चांगल्या विषयी का विचारतोस? चांगला असा एकच आहे; तरी तू जीवनात प्रवेश करू पाहतोस तर आज्ञा पाळ." तो त्याला म्हणाला, "कोणत्या?" येशू म्हणाला, "खून करू नको. व्यभिचार करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देवू नको, आपल्या बापाचा व आपल्या आईचा सन्मान कर. आणि जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर," तो तरुण त्याला म्हणाला, "मी हे सर्व पाळले आहे; माझ्या ठायी अजून काय उणे आहे?" येशू त्याला म्हणाला "पूर्ण होवू पाहतोस तर जा, तुझे असेल- नसेल ते विकून दरिद्रांस दे, म्हणजे तुला स्वर्गात संपत्ती मिळेल; आणि चल, माझ्यामागे ये." पण ही गोष्ट ऐकून तो तरुण खिन्न होऊन निघून गेला; कारण त्याची मालमत्ता पुष्कळशी होती.तेव्हा येशू- "स्वर्गाच्या राज्यात धनवानाचा प्रवेश होणे कठीण आहे, जे आत्म्याने 'दिन' ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे"; असे म्हंटले.

(मत्तय 19:19-26 & 5:3)

2. येशू,"पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवितो तो मेला असला तरी जगेल; आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही, हे तू खरे मानतोस काय?" असे म्हंटले.

(योहान 11:25-26)

3. येशू हे नाव सोडून दुसऱ्या कोणाकडून तारण नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही. (प्रेषितांची कृत्ये 4:12)

4. येशूवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात. (प्रेषितांची कृत्ये 10:43)

*दिनांक 06-04-2012 शिवमोग्ग जिल्हेचा सगळ्या दैनिकबातमीपत्रामध्ये प्रसिद्ध झालेले लेख*

## 18. येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर उद्गारलेले 7 उद्गार.

"मी एक पौरात्य देशीय होवून येशू ख्रिस्तांची आराधना करणे झाले तर माझ्यासाठी एकच मार्ग आहे ते म्हणंजे त्यांना मी एक खरा देव मानून त्याची आराधना करणे." **-स्वामी विवेकानंद**
(कृती श्रेणी, संपुट – 7, पान. न. 59)

➢ स्वतःला अपमान करून हिंसा करत असलेल्या लोकांना पाहून प्रभू येशूने हे पहिले उद्गार काढले.

1. येशू – **"हे बापा, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करितात हे त्यांना समजत नाही.**" (लूक 23:34)

➢ स्वतःचे पापे काबुल करून, स्वर्गाची विनंती करण्याऱ्या, व प्रभूच्या शेजारीच खिळवीलेल्या त्या चोराला पाहून दुसरे उद्गार काढले.

2. येशू त्याला म्हणाला – **"मी तुला खचित सांगतो, तू आज माझ्याबरोबर सुखलोकांत असशील."** (लूक 23:43)

➢ त्याची आई आणि जवळ उभा असलेल्या त्याचे प्रिय शिष्य ह्यांना पाहून तिसरे उद्गार काढले.



3. येशूने आपल्या आईला म्हटलें- **"बाई, पाहा, हा तुझा मुलगा."** मग त्याने त्या शिष्याला म्हटलें**, "पहा, हि तुझी आई."** (योहान 19:26-27)

➢ अति पवित्र देव ह्या जगाच्या सर्व मानवाच्या पापे ख्रिस्तावर घातल्याने तो पापी झाला तेव्हा हे चौथे उद्गार काढले.

4. येशू मोठयाने आरोळी मारून बोलले- **"माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केला?"** (मार्क 15:34)

➢ अगोदरच्या रात्री धरल्या गेल्यानंतर, त्या दिवशी सकाळी 9 वाजल्यापासून दुपारी 3 वाजेपर्यंत उन्हामध्ये रक्त सतत अंगातून रक्त वाहिल्यामुळे, दमलेला प्रभू येशू नियामाशास्त्राचे वचन पूर्ण व्हावे यासाठी पाचवे उद्गार काढले.

5. येशूने शास्त्रलेखन पूर्ण व्हावा म्हणून, **"मला तहान लागली आहे"** असे म्हटलें. (योहान 19:28)

➢ वधस्तम्भावर आपले कार्य पूर्ण झाल्यानंतर सहावे उद्गार काढले कि

6. येशू – **"पूर्ण झाले आहे**," असे म्हटलें. (योहान 19:30)

➢ पित्याची इच्छा पूर्णपणे करून झाल्यावर शेवटचे उद्गार काढले

7. येशू उच्चस्वराने ओरडून म्हणाले – **"मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपवून देतो."** (लूक 23:46)

देवाने सर्व लोकाचे पाप येशू ख्रिस्तावर घातले; जन्म/कर्म पाप विरहित, परिशुद्धं ख्रिस्त आमच्या पापा मुळे, पापस्वरूप होऊन, लोकाची सर्व पापे स्वतःवर घेऊन, वधस्तंभावर ६ तास घोर शिक्षा पावून '**पूर्ण झाले**' म्हणून, आपला प्राण दिला. म्हणून सर्व लोकाचे पापविमोचन झालेल्या त्यां शुक्रवारला उत्तम शुक्रवार असे म्हणतात.

*[दिनांक 06-12-2013 शिवमोग्ग जिल्हेचा स्थानिक दैनिक बातमी पत्रामध्ये प्रसिद्ध झालेला लेख]*

## 19. प्रभू येशू ख्रिस्तांच्या शिक्षणाची घोषणा सर्व जगभर करण्यात आली.

"शतकावर शतके संपून गेले तरी ख्रिस्ताने जगावर वर्षाव केला आहे ते अजून पूर्णपणे विस्तार झाला नाही. तरी अजून ते काही शिथिल झाले नाही. काल क्रमाने ते अजूनही अधिक प्रबळ बनत येणार आहे."

**-स्वामी विवेकानंद**

(करती श्रेणी, ख्वाद – 7, पान. न. 52)

येशू ख्रिस्त 2023 वर्षा पूर्वी ह्या भूमीवर मनुष्य होऊन जन्म घेऊन साडेतेहतीस वर्ष जगले. त्यांच्या जीवनाचे शेवटची साडेतीन वर्षे खेड्या-पाड्यांना पादयात्रा करून शिक्षण देत होते, कि 'द्वेष आणि स्वार्थने, अशांतीने भरलेल हे जग आम्हा कोणासाठी शाश्वत ठिकाण नव्हे; त्यामुळे मानवाचे जगणे कसे असावे, आणि ह्या जगातील प्रवास संपल्यावर मुक्ती प्राप्त करून घेण्यासाठी काय करावे. ते जसे ते शिक्षण देत होते तसे ते वागतही होते. त्यामुळे लोकांचे थव्यांचे थवे त्यांच्यामागे येवू लागले. एक दिवस त्यांनी एका डोंगरावर जावून रात्रभर तिथे प्रार्थना केले. सकाळी त्यांच्या मागे आलेल्या लोकामधुन 12 जणांना निवडून घेतले व त्यांना प्रेषित असे नाव ठेविले. त्याना असे उपदेश केला कि – "पहा मी तुम्हाला लांडग्यांमध्ये मेंढरे सोडल्यासारखे तुम्हाला जगामध्ये पाठवत आहे. ह्या युगाचा शेवट जवळ आला आहे. म्हणून तुमच्या पापांसाठी पश्चाताप करून मोक्ष मिळावा' अशी घोषणा करत राहा. रोगी लोकांना बरे करा. मेलेल्यांना उठवा. कुष्ठरोग बरे करा. भूताना घालवा. फुकट मिळाले आहे ते फुकट इतरांना द्या." असे त्यांना आज्ञा देवून पाठवले. त्यांनी तसेच करू लागले ते परत येवून प्रभूला वृतांत दिला, कि "प्रभू भुते देखील तुमच्या नावाने आम्हाला आधीन होतात." तेव्हा येशू त्यांना बोलले की "तुमचे नावे स्वर्गामध्ये लिहिले आहेत म्हणून आनद करा."

पेत्र प्रभूला म्हणला कि "प्रभुजी पाहा आम्ही सर्व काही सोडून तुम्हाला अनुसरलोय. आम्हाला काय मिळेल?" तेव्हा येशुने उत्तर दिले, कि "तुम्हाला तर



अनेक पटीने जास्त मिळेल. आणि तुम्ही मुक्ती पावाल." प्रभू येशू मरून, पुन्हा उठून, 40 दिवस आपल्या शिष्यांना दर्शन देत, त्यांच्या बरोबर होते. त्यांनी स्वर्गाला चढून जाण्या दिवशी आपल्या शिष्यांना म्हटले **"पहा, स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार मला देण्यात आले आहे. मी युगाच्या समाप्तीपर्यंत तुमच्या बरोबरच आहे. म्हणून, तुम्ही जगाच्या सर्व ठिकाणी जावून ह्या मुक्ती मार्गाची घोषणा करा."** अशी आज्ञा दिले.

हे प्रेषित लोक, विलासी जीवन मिळावे म्हणून प्रभू येशूचे अनुसरण केले नव्हते. मान, बहुमान, प्रतिष्ठा, ह्या मिळतील असेही कधी त्यानी अपेक्षा केली नाही. प्रभू सुद्दा त्यानां राजवाड्याचे आमिष दाखवून बोलावले नाही. गालीलचा समृद्ध भागात, किंवा यरुसलेम सारख्या मोठ्या शहरात एक भक्कम भविष्य घडवून घेण्याची सर्व शक्यता असताना देखील, हे शिष्य त्यांच्या जीवनाला धोक्याच्या कठीण रस्त्यावर वाहून दिले. प्रभू येशूने शिकविलेले दया, शांती, आणि प्रीती, ह्या संदेशाना सर्वत्र पसरवत, भटक्यासारखे फिरत असण्याचा जीवन त्यांनी निवडिले

### प्रभू येशू ख्रिस्ताने निवडून घेतलेल्या 12 प्रेषिताबद्दल संक्षिप्त माहिती

(मत्तय 10: 2-4, मार्क 3:16 – 19, लुक 6: 14-16 )

प्रभू येशूने समुद्रामध्ये जाळी पसरत असलेल्या बंधू जणांना पाहून त्यांना म्हटले "तुम्ही माझ्या मागे या, म्हणजे मी तुम्हाला माणसे धरणारे करीन." त्या क्षणीच ते त्यांचे जाळी तिथेच सोडून त्याच्या मागे गेले.

**1.पेत्र** : हा मासेमारी करणारा शिष्यांपैकी एक होता. हा सधृढ, तरी काही क्षेत्रामध्ये कमकुवत असा होता. ख्रिस्त जेव्हा त्याला बोलवत असता, हा येशूचे पाया पडून "मी पापी आहे, मला सोडून निघून जावे." असे बोललेला हा माणूस! असा हा नम्र व्यक्ती. सरळ, धीट, आणि प्रेमळ असे व्यक्तीमत्व असणारा. हाच प्र-प्रथम, प्रभू येशूला म्हणाला होता कि "तुम्हीच जिवंत देव, देवपित्याचा अभीवचना प्रमाणे प्रकट झालेला ख्रिस्त, (अभिषिक्त) आहात. तुमच्यामाध्येच मानवांच्या मुक्तीचे बोल ( जीवंत वचन) आहेत. देवाने नेमलेला तो तुम्हीच आहात." प्रभू येशू ख्रिस्ताने ह्या

सेवकाला दिलेल्या प्रशिक्षणासारखे, दुसर्या कोणालाही प्रशिक्षण मिळाले नाही. तसेच ह्याला प्रभुने रागवल्या सारखे दुसऱ्या कोणालाही रागवलेही नाही. ह्याच्यावर प्रेम केल्यासारखे दुसर्या कोणावरही केले नाहीत. हा काही महान पंडित नसला तरी ह्याचा एकच भाषणाने ३००० पेक्षा जास्त लोक ख्रिस्तावर विस्वास ठेवले. ह्याच्या सावलीने सुद्धा रोगी लोक बरे होत असत. इतक्या सामर्थ्याने ह्याला परमेश्वराने वापरले. ख्रिस्ताच्या पुनरुत्थाना नंतर मोठ्या धाडसाने देवाच्या सुवार्तेला प्रसिद्धीस आणलेला प्रेषित हा होय. ह्याला रोम शहरामध्ये वधस्तंभांवर फाशी देत असताना ख्रिस्ता सारखेच मरण पत्करण्यास मी योग्य नाही असे समजून उलटे लटकवण्याठी विनंती केली. तसेच त्याला उलटे लटकावून ठार करण्यात आले. **शाहिद वर्ष: ख्रि. श. 64**

**2.आंद्रेय:** हा पेत्राचा सख्खा भावू आणि बाप्तीस्मा करणारा योहानाचा शिष्य होता. ह्याचा गुरु योहान, येशूला पाहून "हाच देवाने नेमलेला यज्ञाचा पशु" म्हणाला होता. आपल्या गुरुकडून असे ऐकल्या नंतर हा आंद्रेय, प्रभू येशूचा अनुयायी झाला. हाच पेत्राला प्रभू येशू कडे आणला होता. हा योहानाकडून बरेच प्रशिक्षण पावला असला तरी, त्याच्यापेक्षा लहान असणारा पेत्राच्या नेतृत्वाखाली काम करत राहीला व पेत्राच्या सेवेस मजबूती आणली व अनेकाना ख्रिस्ताकडे वळविले. हा आम्हासाठी एक आदर्श आहे. ज्या ठिकाणी पेत्र ३ हजारपेक्षा जास्त लोकांना प्रभू येशूकडे आणले होते त्याच जागेत ह्याला चाबकाने मारून, जखमी करून, (गुणाकार आकाराचा) वधस्तंभावर दोन दिवसापर्यंत लटकून ठार केले. हा प्राण जाईपर्यंत, हिंसा करणार्यांना, प्रभू येश्च्या प्रीतीबद्धल, मुक्तीच्या मार्गाबद्धल सांगत राहिला होता. **शाहिद वर्ष : ख्रि.श 70**

**3.याकोब :** हा योहानाचा मोठा भावू होता. प्रभू येशूला दुरून नातेवाईक लागायचा. ह्याला प्रभू येशुबद्धल बालपणापासून परिचय असण्याची शक्यता आहे. ह्याला प्रभू येशुकडून 'गर्जनेचा पुत्र' असे नाव मिळाले होते. हा प्रत्येक वेळी गुढघे टेकुनच प्रार्थना करत असल्यामुळे ह्याचे गुढघे उंटाच्या पायांप्रमाणे घट्ट झाले होते. प्रभू येशूचे रुपांतर घटनेवेळी त्या डोंगरावर पेत्र व योहान ह्यांच्या



सोबत हा पण होता. आणखी एखदा प्रभू येशू गेत्सेमने बागेत प्रार्थनेस जात असताना पेत्र व योहानासोबत ह्यालाही घेवून गेले होते. हा स्पेन देशात जावून सुवार्ता सांगितला. हेरोद राजा मंडळीचा छळ करताना, ह्याला तरवारीने शिरच्चेदन करून मारला. प्रभू येशू साठी रक्तसाक्षि झालेल्या प्रेषितामध्ये हाच **प्रथम शहीद** झालेला शिष्य होय. **शाहिद वर्ष: ख्रि. श. 44-45**

**4. योहान:** याकोबाचा भावू ह्यालासुध्दा येशुकडून "गर्जनेचा पुत्र" हे नाव मिळाला होता. हा सदा येशू प्रभूच्या उराशी टेकलेला (प्रभूशी घनिष्ठ असणारा), त्याचा प्रिय शिष्य होता. प्रभू येशू वधस्तंभावर असताना ह्या प्रेषिताला पाहून, आपल्या आई मरिया हिला म्हणाले होते की "आई, हा पहा तुझा मुलगा" त्या दिवसापासून हा येशूच्या आईला आपले घरी नेवून, शेवटपर्यंत सांभाळला होता. किती मोठा हा मान ह्या शिष्याचा ! प्रभू येशूला वधस्तंभावर टांगले असता बाकीचे सगळे पळून गेले, पण हा मात्र येशू सोबत राहिला. एकदा ह्याला उखळत्या तेलात घातले होते, तरी कोणताही इजा न होता त्यातून हा बाहेर आला. प्रभू येशु म्हणाले होते कि, "माझ्याकरिता जो आपला प्राण गमाविल तो ते परत मिळवतो" हा बोल किती खरे आहे हे ह्याच्या जीवनातून शिकता येते. सेवेमुळे हा पात्मोस बेटावर बंदी असता, प्रभू येशू ह्याला दर्शन देवून जगाच्या शेवटी घडणारे घटनेबद्दल प्रकटीकरण दिले (जगाच्या शेवटचे भविष्य) प्रभू येशूच्या शिष्यांपैकी अति वृद्ध होवून नैसर्गिक मरण पावलेला हा एकमेव प्रेषित. **नैसर्गिक मरण वर्ष: ख्रि.श. 95**

**5. फिलिफ :** योहानकृत शुभवर्तमान मध्ये फिलिपचा ठळकपणे उल्लेख आहे, विशेषतः ग्रीक समुदायाच्या संबंधात, ग्रीक नाव असलेला आणि बहुधा भाषेत अस्खलित असलेला, फिलिप अनेकदा त्याच्या समुदायातील सदस्यांची येशूशी ओळख करून देत पुलाचे काम करत असे. शेवटच्या रात्रीच्या जेवणाच्या वेळी, फिलिपने येशूला विचारले, "प्रभु, आम्हाला पिता दाखवा, आणि ते आमच्यासाठी पुरेसे असेल." या विनंतीमुळे एक गहन क्षण आला जिथे येशूने पिता आणि पुत्राच्या ऐक्याबद्दल शिकवले. नवीन करारातील प्रेषितांमध्ये फिलिप सातत्याने पाचव्या क्रमांकावर आहे. हिरापोलिस शहरात शिरच्छेद करून

शहीद झाल्याची परंपरा आहे. तो सहसा लॅटिन क्रॉस द्वारे प्रतीक आहे, त्याच्या विश्वास आणि हौतात्म्य प्रतिबिंबित. फिलिपशी संबंधित इतर चिन्हांमध्ये दोन भाकरी असलेला क्रॉस, ब्रेडची टोपली, पितृसत्ताक क्रॉस असलेला भाला आणि सुताराच्या चौकोनाशी जोडलेला वधस्तंभ यांचा समावेश होतो. जुलै 2011 मध्ये, पुरातत्वशास्त्रज्ञांना हिरापोलिसमध्ये फिलिपची कबर सापडली. डेनिझली जवळ, तुर्की. नव्याने सापडलेल्या चर्चमध्ये सापडलेले शिलालेख आणि थडग्याच्या अनोख्या रचनेवरून ते शहीद प्रेषिताचे असल्याचे ओळखले जाते. या उल्लेखनीय शोधामुळे फिलिपच्या अंतिम विश्रांतीच्या ठिकाणाची ऐतिहासिक पुष्टी झाली, जसे की तुर्कीच्या वृत्त स्रोतांनी नोंदवले.


**शाहिद वर्ष: ख्रि. श. 54**

**6. बर्थलमय** ( नथनियेल) : येशूचा शिष्य फिलीफ ह्याच्या सांगण्यावरून, प्रभू येशूला पाहण्यासाठी, हा येशूकडे आला होता. प्रभू येशू स्वतः ह्याला '*निष्कपट इस्रायेली* 'असे नाव दिले होते. प्रभू सोबतचे काही क्षण ह्याला प्रभूचे शिष्य बनवले. हा प्रेषितासोबत प्रार्थनेमध्ये तत्पर राहणारा प्रार्थनावीर होता. हा प्रेषितांच्या काळातील अधिकृत पुढार्यांपैकी एक होता. ह्याने भारत आणि आर्मेनिया ह्या देशामध्ये प्रभावी सेवा केले आहेत. ह्याला शेवटी चाबकाने मारून, जिवंतपणे चामडी सोलून, मुंडके उडवून ह्याला मारण्यात आला.

**मरण वर्ष ख्रि. श. 70**

**7. थोमा** : हा सुद्दा मासेमारी कराणारा होता. ह्याचा विश्वास अंधविश्वास नव्हता. हा तर प्रभू येशू ख्रिस्ताच्य पुनरुत्थानावरही संशय घेतला होता, त्यामुळे सर्वांच्या देखत प्रभू ह्याच्या साठी प्रगट झाले तेव्हा प्रभूच्या महिमामय शरीराला स्पर्श करण्याचा भाग्य मिळाला होता. हा अंदाजे ख्रि. श. ५२ मध्ये भारतात केरळ राज्यामध्ये दाखल होवून, अंदाजे १० वर्षे सेवा केले. नंतर चेन्नई मध्ये १० वर्षे सुवार्ता सांगत होता, इथेच काही पुजारी भाल्याने भोसकून, ह्याची हत्या केली आणि चूलीत घालून जाळले. हा आमच्या देशामध्येचं प्राण सोडला आहे. अख्या







जगात काही प्रेषितांच्या कबरेवर चर्च बांधले आहेत. व्यातीकन शहरामधील सेंट पीटर (पेत्र) चर्च, स्पेन देशातील सेंट जेम्स (याकोब) चर्च, आणि भारतातील चेन्नई मध्ये सेंट थोमस (थोमा) चर्च हे आहेत. ह्याच्या आठवणीसाठी भारत सरकार पोस्ट तिकीट छापले आहे.

**शाहिद वर्ष: तारीख : 21-12-0072 स्थळ: मैलापूर ( चेन्नई) भारत.**

**8. मत्तय :** हा रोमी अधिकाराखाली कफर्णहुम गावात जकात गोळा करणारा जकातदार होता. हा एक मोठा पंडित होता. प्रभू येशू "माझा अनुसरण कर" असे म्हणाले ह्या एकाच शब्दाने, सर्व काही सोडून प्रभूच्या मागे गेला. हा त्या दिवशी प्रभुला आपले घरी नेवून, आपल्या सर्व मित्र व पाहुण्याना जमवून प्रभू येशूचे परिचय करून दिला. त्याना येशूचे आशीर्वाद मिळवून दिला. हा शिष्य ग्रीक, अरामीक, हिब्रू, ल्यातीन भाषेचे पांडित्य मिळवला होता. हा इथीयोपियां, सिरीया, आणि पर्शिया देशामध्ये प्रभावी सेवा करून मंडळ्या तयार केले आहेत. ख्रिस्तांच्या मातृभाषेत म्हणजे आरमिक मध्ये सुवार्ता लिहिला आणि प्रकाशित केला. ह्याला भाल्याने भोसकून मारले होते. **शाहिद वर्ष ख्रि. शक 60-70**

**9. अल्फिचा मुलगा याकोब :** आपल्या भावासोबत येशूचे अनुसरण करणारा ह्या शिष्य, येशूच्या पुनरुत्थाना नंतर यरुशलेम मध्ये सेवा केला, आणि मंडळ्याना मजबुती आणली. प्रेषित पौल याकोब, पेत्र व योहान ह्या तिघाना मंडळ्याचे आधारस्तंभ म्हणूणे हे एक विशेष आहे. ह्याला मंदिराच्या १०० फुट उंच बुरुजावरून ढकलून दिले तरी हा मेला नव्हता. ९४ व्या वर्षी ह्याला परटाच्या काठीने मेंदू बाहेर येवू पर्यंत मारून ठार केले. **शाहिद वर्ष: ख्रि. श 63**

**10 तद्दय :** ह्याला याकोबाच्या मुलगा यहुदा असे ही म्हणायचे. हा एखदा प्रभू येशूला म्हणाला होता कि "प्रभू, असे काय घडले आहे की तू जगाला दिसणार नाही मात्र आम्हाला दिसणार?" तेव्हा ख्रिस्त म्हणाले होते कि "जर कोणी माझ्यावर प्रेम करीत असेल तर तो माझ्या सांगण्याप्रमाणे चालेल. आणि माझा पिता ( परमेश्वर) त्याच्यावर प्रेम करील आणि आम्ही दोघे त्याच्या सोबत राहू. आता तुम्ही ऐकलेल्या वचन माझे नाही तर मला पाठवलेल्या देवाचे आहेत."

ख्रिस्ताचे उपदेश सांगण्यासाठी यरुशलेम सोडून परदेशी जावून सेवा केलेले शिष्या पैकी हा प्रथम शिष्य ठरला आहे. सिरिया आणि उत्तर पर्शिया देशात ख्रिस्तमार्ग शिकवून अनेकाना ख्रिस्ताकडे आणले होते. सेवेमध्ये अनेक कष्ट झेलले. शेवटी आर्मेनिया देशात ह्याला काठीने मारून मारण्यात आले.

**शाहिद वर्ष**: ख्रि**. शक. 72**

**11**. **मताभिमानी शिमोन:** यहुदी लोकांवर फक्त यहोवा देवाचाच अधीकार ( राज्य) असावा असे विशास ठेवाणारे एक संघटना होती. हा त्या संघटणा सोबत जुळलेला गालीली तरुण होता. पेत्र आणि आंद्रेय ह्यांच्या सोबत प्रेषित पदापर्यंत पोहचला होता. पूर्ण उत्साहाने सुवार्ता ब्रिटन बेटा पर्यत सुवार्ता पोहचला होता. येशू प्रभूला धरून दिलेला यहुदाचा जसा विश्वास होता, तसाच हा पण म्हणायचा कि प्रभू येशू यहुद्याना रोमी राज्याच्या तावडीतून सोडवणार आहे. तो यहुदा आपल्या गुरूलाच धरून देवून शेवटी आत्महत्या करून घेतला, पण हा तर त्या गुरुचे उपदेश सर्वत्र पसरवून हुतात्मा झाला. हे किती श्रेष्ठ आहे ना? हा येशूचे शिष्य ग्रेट ब्रिटन आणि इजिप्त बरेनी आफ्रिका मार्बनिया लिबिया आणि इत्यादी देशामध्ये ख्रिस्ताचे उपदेश पोहोचला. भरपूर लोकाना हा ख्रीस्तासाठी जिंकत होता म्हणून ह्याला वधस्तंभांवर खिळवले आणि नंतर तुकडे तुकडे केले आणि मारले.

**शाहिद वर्ष**: **ख्रि. श**. **74**

**12. यहुदा इसकारियोत:** एकदा मरियाने खूप महाग सुगंधी तैलाची भांडी आणली आणि येशूच्या पायावर ओतली व आपल्या केसांनी त्याचे पाय पुसले. त्या तेलाच्या सुगंधाने संपूर्ण घर भरून गेले. जेव्हा यहूदाने हे पाहिले आणि पाहिले की तो हे तेल तीनशे पैशांना विकू शकतो, तेव्हा येशूपेक्षा पैसे त्याच्यासाठी महत्त्वाचे होते. ख्रिस्त सर्वज्ञ असूनही त्याने त्याला साडेतीन वर्षे आपल्याजवळ ठेवले आणि मरेपर्यंत त्याच्यावर प्रेम केले. जरी अनेक पापी आणि भ्रष्ट लोक ख्रिस्ताच्या जीवनाने, उपदेशाने आणि चमत्कारांनी धर्मांतरित झाले असले तरी, त्याच्यामध्ये कोणतेही धर्मांतर झाले नाही. जणू काही पैशाचे मोह हे सर्व पापांचे मूळ आहे, त्याला 30 चांदीची नाणी हवी आहेत आणि महान मानवतावादी जगाचा तारणहार ख्रिस्त याला शत्रूच्या हाती धरून तो जगाच्या



इतिहासातील सर्वात मोठा विश्वासघातक बनला. आतापर्यंत कोणत्याही पालकांनी आपल्या मुलांचे नाव यहूदा ठेवलेले नाही. त्याच्या मोठ्या विश्वासघातामुळे त्याने आत्महत्या केली आणि आपला मौल्यवान आत्मा गमावला. जर त्याने धीर धरला असता आणि ख्रिस्ताकडे येण्यासाठी स्वतःला समर्पित केले असतें आणि क्षमा मागितली असेल असती तर ख्रिस्ताने त्याला नक्कीच क्षमा केली असती. पवित्र बायबलच्या प्रकाशनात लिहिलेल्या नवीन यरुशालेम (स्वर्गाच्या) 12 पायावर लिहिलेल्या 12 प्रेषितांच्या नावांमध्ये त्याचे नाव होते.

**आत्महत्येचे वर्ष होते इ.स. 33**

**13. मथ्तीय :** हा प्रारंभापासून ख्रिस्ताचा अनुयायी होता. प्रभू येशू निवडलेल्या ७0 लोकांच्या मध्ये हा एक होता. येशूला जिथे सुवार्ता सांगावयाचे होते तेथे अगोदर जावून सुवार्ता सांगत होता. चांदीचे 30 रुपये साठी आपल्या गुरूलाच धरून दिलेल्या यहुदा इस्कर्योत ह्याच्या ऐवजी ह्याला प्रेषितांनी ह्याला चिती टाकून निवडले. कारण हा प्रभू येशूच्या दिवसा पासून प्रेषितासोबत चांगले नाते संबंध बाळगून होता. पवित्र शास्त्राच्या प्रकटीकरण ह्या पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे नवीन यरुशलेम मधील 12 पायांवर लिहिलेल्या 12 प्रेषितांच्या नावामध्ये ह्याचाही एक नाव असणार आहे. किती महान भाग्य! हा इस्राएलमधील यरुशलेम मध्ये प्रभावी संदेश सांगत असत. शेवटी ह्याला दगडफेक करून, शिरछेदन करून मारले. ह्याच्या देहाचे काही अवयव जर्मनीच्या त्रायार मध्ये आणि इटलीच्या रोम शहरामध्ये सुद्धा ठेवण्यात आले आहे.

**शाहिद वर्ष**: **ख्रि. श 70**

**14. पौल :** पुनरुत्थान पावलेल्या प्रभू येशूकडूनच निवडण्यात आलेला प्रेषित म्हणजे हा. हा एक तरुण, श्रीमंत, आणि आताच्या ३ पि हेच. डी. ला समान असा विध्याभ्यास केलेला एक पंडित पुढारी होता. यहुदी धर्मामध्ये अति अभिमान असल्याने , ख्रिस्ताच्या अनुयायीना जेलमध्ये घालण्यासाठी अधिकार पत्र मिळवून, प्रवास करत असताना, पुनरुत्थान पावलेला येशू ख्रिस्तांचे दर्शन झाला आणि ह्याचे परिवर्तन झाले. ह्याला प्रभू येशुकडून आदेश मिळून, यहुदितर लोकाना सुवार्ता सांगण्यासाठी नेमला गेला. ह्या पाचारणा मुळे स्वतःच्या सर्व

गोस्टीना कचरा असा लेखला, व ख्रिस्ताच्या सेवेसाठी स्वतःला समर्पण करून टाकला. तो "जगलो किंवा मेलो तरी प्रभू येशूचा महिमा व्हावा" अशी मनीषा बाळगून होता. हा तीन सुवार्ता प्रवास करून ५ खंडामध्ये ५०० पेक्षा जास्त मंडळ्या रचला होता. देव ह्याच्या हातून मोठ-मोठे चिन्ह चमत्कारे घडविले. ह्याच्या वस्त्राला कोणी शिवले तरी त्याना बरे होत असत आणि भुते निघत असत. हा मेलेल्या मुलाला सुद्धा जिवंत केलेली घटना पवित्र शास्त्रामध्ये नमूद झाले आहे. त्याचे स्वकीय लोकच त्याला विरोध केला, हा अनेक संकटाना सामोरे गेला. अनेक वेळा जेल मध्ये गेला. अंदाजे ३०० चाबकाचे मार तो सोसला. काही वेळा उपाशी रहावे लागले, थंडीमध्ये, निर्वस्त्र रहावे लागले, तरी कठीण परिश्रम करत प्रभूचे सुवार्ता सर्वत्र पसरवला. पवित्र शास्त्रामध्ये ह्याचे १३ पत्र आहेत. हा इतरांकडून दान, पैसा अपेक्षा न करता, स्वतः तंबू विणण्याचे काम करून, स्वतःचे व इतरांचे गरजा भागवत असत. आणि स्वतः भाड्याने घेतलेल्या घरामध्ये घरामध्ये राहून धैर्याने देवाच्या राज्याची घोषणा करत, प्रभू येशू बद्धल माहिती सांगत होता. शेवटी हा म्हणतो कि "उत्तम युद्ध मी केला आहे, विश्वास राखीला आहे, नितीमानाना मिळणारा मुकुट माझ्यासाठी तयार आहे." ह्याला शिरच्छेदन करून मारण्यात आलय अशी नोंद इतिहासाच्या पुस्तकात अढळते. किती महान प्रेषित हा होवून गेला! **शाहिद वर्ष: ख्रि. श 70**

वर नमूद झालेले प्रेषित हे साडेतीन वर्षे प्रभू येशू सोबत राहून, त्याचे व्यक्तिमत्व व देवत्व पाहिले. एवेढेच नाही तर मेलेल्यातून पुनरुत्थान पावलेल्या प्रभू येशुसोबत चाळीस दिवस राहिले. आणि शेवटी प्रभू येशू वर आकाशात चढून जात असताना स्वतः आपल्या डोळ्यांनी पाहिले असल्यामुळे, ते प्रभू येशू ख्रिस्तांचे उपदेश आपल्या जीवनाने, पूर्ण जगाला पोहचवण्यासाठी, स्वतःचे जीवनच समर्पण केले. अनेक संकटाना सामोरे गेले. विविध देशाना कष्टभरीत प्रवास केला. ख्रिस्त येशूच्या नावामुळे अपमान सहन करण्यासाठी आपण योग्य झालो, असे आनंद व्यक्त केले . प्रभू येशू ख्रीस्तांची सेवा हे उपदेश मात्र नव्हे तर चिन्ह चमत्कारांनी भरलेले असे आहे. ते अनेकांच्या जीवन पावन केले आहे. आणि प्रभू येशू ख्रिस्तांचे दैवी गुणांना स्वतच्या जीवनात उतरवत समाजाला एक मोठा योगदान देणारी व्यक्ती असे बनवते.



## डा. ग्राहम. स्टेन्स.



ह्याला उदाहरण म्हणून आमच्या देशातील ओरिसा ह्या राज्यामध्ये कुष्ठरोग्यांची सेवा करण्यासाठी आलेले आस्ट्रेलिया देशाचे डा ग्राहम स्टेन्स ह्यांना तारीख 22/ 01/ 1999 दिवशी, त्यांचा 10 वर्षाचा मुलगा फिलीफ आणि 6 वर्षाचा मुलगा तीमथी ह्या निरागस लांच्या सोबत आपल्या गाडीत झोपले असताना अमानुषपणे हिंसा करून लोकानी त्या तिघांना जाळून टाकले. ह्या घटनेचा तेव्हाच्या राष्ट्रपतीने के. आर. नारायणन ह्यांनी असे खेद व्यक्त केले कि "जी व्यक्ती आपल्यातील कुष्ठरोग्यांची सेवा करण्यासाठी आली होती, त्यांना आम्ही गौरवाने पहावयास पाहीजे होते. पण सहिष्णुता आणि अहिंसा ह्या गुणासाठी जो देश नावाजलेले आहे त्याच देशात असे अमानुषपणे जिवंत जाळण्याचे प्रकार घडले हा अघोरी कृत्य होय, ही जगातील अत्यंत निषेधनीय गोष्ट आहे."

असल्या परिस्थितीमध्ये सुद्धा त्यांची पत्नी श्रीमती ग्लाडीस त्यां च्या पती व मुलाना मारलेल्या लोकाना क्षमा केली, तसेच आपल्या मुलीलाही त्याना माफ करण्यास सांगितले. आणि तीही समती दिली. त्या दिवशीच त्याना मनापासून क्षमा केले. ही एक दैवी प्रीती आहे. त्यांनी आपल्या देशाला दिलेल्या सेवेचे दाखल घेवून भारत सरकार त्यांना "पद्मश्री" आणि "मदर तेरेसा मेमोरिअल अंतराष्ट्रीय पारितोषक" देवून गौरविले आहे. हाच स्वभाव सर्व माणसांच्या मनात उद्भवला तर स्वर्गाचे अनुभव इथेच घेता येईल. म्हणूनच आज करोडो लोक प्रभू येशूच्या उपदेशाने प्रभावित होवून, त्याचे हे उपदेश आख्या जगाला सांगण्यासाठी आपले जीवन त्यागत आहेत. त्यांच्यातील अनेकांची अमानुषपणे हत्या केली आहे. तरीही सेवा आजपर्यंत चालू आहे. कारण ह्या उपदेशांचे उद्देश म्हणजे प्रत्येक मनुष्याने प्रीती दया आणि बंधुत्व ह्या दैवी गुणाना अमलात आणून मुक्ती मिळवावे. आणि आदर्श व्यक्ती होवून जगावे हेच आहे व समाजाला उत्तम देणगी देवू करून सेवा करावे असे आहे.

## मदर तेरेस्सा



ह्या दिनांक 28-08-1910 रोजी युगोस्लाविया येथे जन्म घेतले. 8 व्या वर्षी आपल्या पित्याला गमावलेली हीला, तिची आईने तिला चर्चचे भक्तीमध्ये वाढवली. आपल्या १८व्या वर्षी तिने सन्यास घेतला व भारतात सेवा करण्यासाठी कलकत्ता येथे आल्या व एका शाळेत शिक्षिका म्हणून सेवा सुरु केली. २० वर्षे शैक्षणिक सेवा केले. तेव्हा त्या शाळेमागे असणार्या झोपडपट्टीत जेवण आणि छप्पर नसताना कण्हत कितपत पडलेल्या रोगी लोकाना पाहत होती. त्यांच्यासाठी ती प्रभूकडे प्रार्थना करीत होती आणि त्यांच्यासाठी काहीतरी करावे असे तिच्या मनात घोळत असे. नंतर त्या नर्सचे शिक्षण घेतले. फक्त ५ रुपये होते, तेवढ्यातच एक निराश्रीताचा केंद्र प्रारंभ केले. लोकांकडून मदत मागून त्या रोगी लोकांची काळजी घेत होत्या.

एखदा त्या निराश्रितांसाठी मदत मागण्यासाठी रस्त्यावर उतरून, दान मागत असताना एक माणूस त्यांची कुचेष्टा करून "तुम्ही परदेशी माणसे नाटक करता, थू!" असे म्हणत त्यांच्या हातावरच थुंकला, तेव्हा त्या म्हणाल्या "हे माझ्यासाठी दिला ठीक आहे, आता गरीबांकारीता द्या" म्हणत दुसरा हात पुढे केला. तो माणूस फार लज्जित झाला, व त्याना मदत करणारा झाला.

कलकत्ता येथे काळी मंदिराजवळ रोगी लोकांसाठी एक केंद्र होता त्या बद्दल, काही माणसे पोलीस स्टेशन मध्ये जावून, "ह्या मदर तेरेस्सा, सेवा केंद्राच्या नावाखाली धर्मांतर घडवत आहेत," असा आरोप केला, तेव्हा पोलीस अधिकारी पाहण्साठी गेले, तेथे तर सिस्टर्स लोक रोगी लोकांच्या जखमा धुवून, प्रेमाने सेवा करत असलेले पाहिले, मग ते अधिकारी आरोप करणार्याना



म्हणाले कि, "तुम्ही किंवा तुमचे आई, बहिण ह्या रोगी लोकांची सेवा करण्यासाठी, काळजी घेण्यासाठी पुढे या, आताच्या आता ह्यांना येथून बाहेर काढतो" असा प्रस्ताव ठेवला, ते लोक लज्जित होवून परत फिरले.

२००७ पर्यंत १२३ देशामध्ये त्यांचे अंदाजे ६०० सेवा केंद्र उभे राहिले. निराश्रीतांची आई (मदर) ह्या नावाने जग ओळखण्यास सुरु केले होते. त्याना **भारत रत्न** आणि **नोबेल प्रशस्ती** पत्र देवून गौरवण्यात आला. त्या भारतीय नागरिकत्व स्वीकारले होते खरे भारतीय झाले. दिनांक ०५/०९/१९९७ दिवशी त्या मरण पावले तेव्हा, महात्मा गांधीजी, जवाहर लाल नेहरू ह्यांच्या शरीराना नेलेली तोफांची गाडी ह्यांच्यासाठी वापरण्यात आली. त्यांच्या उत्तर क्रिया मध्ये अनेक देशांचे प्रधान, अध्यक्ष लोक हे त्यांच्या कुटुंबासोबत हजर राहिले. हे एक आम्हा भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट होय.

हा स्वभाव प्रत्येक मनुष्यामध्ये उतरले तर स्वर्गाचा अनुभव इथेच घेता येतो. म्हणूनच करोडो लोक प्रभू येशूच्या उपदेशांना मानून, त्याचा शुभ संदेश अख्या जगाला सांगण्यासाठी आपले जीवन समर्पण करत आहेत. त्यांच्यातील अनेकाना निर्दायपणाने ठार करण्यात आले आहे. तरीही प्रभू येशुची सेवा निरंतर चालूच आहे. ह्याच्यात देवाचा उद्देश असा असेल की 'मानवांनी प्रीती, दया, बंधुत्व ह्या दैवी गुणाना साकार करवून घेवून, प्रभू येशुद्वारे मिळणारा तारण मोफत मध्ये मिळवून, इतरांसाठी एक आदर्श व्यक्ती होवून जगावे आणि समाजाला उत्तम देणगी द्यावे'.

म्हणून ख्रिस्तांचे संदेश सर्वत्र सांगत असणार्या अनेक भावू बहिणींना एक वंदन करुया.

तारीख 09/12/2013 दिवशी शिवमोग्गा शहराच्या स्थानिक बातमी पत्रामध्ये प्रसिद्ध झालेला लेख.]



## 20. दैवी ज्ञान.



> “वाईटासाठी वाईट करू नका ... ह्या येशुंच्या उपदेशांचे अनुसरण, हे जग आज करीत नाही ... खरेच हे जग आज पूर्णपणे वाईट झाले आहे.“
>
> **-स्वामी विवेकानंद**
>
> ( ज्ञान दीप – 1563 भाग – 7 पाना.न. 115 )

अंदाजे 3000 वर्षा पूर्वी इस्रायेल देशामध्ये एक राजा होता त्याचे नाव शलमोन. त्याच्याकडे एकदा दोन स्त्रिया आल्या. त्यांच्यातील एक बोलली कि “महाराज, ऐका मी आणि हि स्त्री एकाच घरामध्ये राहतो. हि घरात असतानाच मी माझ्या मुलाला जन्म दिला, तिसऱ्या दिवशी हि सुद्धा एका बाळाला जन्म दिला. आम्ही दोघे एकत्रच राहत होतो. आमच्या दोघीशिवाय घरात दुसरे कोणी नव्हते. हि रात्री झोपेत आपल्या मुलावर झोपल्यावर तिचा बाळ मेला. मध्यरात्री मला गाढ झोप लागले असता, हि उठून हिने तिचा बाळ माझ्याकडे ठेवून, माझ्या बाळाला स्वतः घेतले आहे. सकाळी उठून दुध पाजण्यास मी जात असता तो बाळ मेला होता. मी निरखून पाहिले असता ते बाळ माझे नव्हे तर हिचे आहे हे माझ्या लक्षात आले.“ मग दुसरी हि म्हणाली कि जिवंत बाळ माझे आहे आणि मेलेलं बाळ हिचे आहे.“ पहिली परत बोलली कि “नाही मेलेले बाळ तिचे होते, जिवंत मुलगा माझे आहे.” असेच दोघेही राजासमोर वाद घालत होते. तेव्हा तो राजा म्हणाला कि जिवंत असलेल बाळ माझे आहे व मेलेलं तुझे आहे असे दोघेही बोलत आहेत. आता मला एक तरवार द्या असे राजाने आपल्या सेवकांना आज्ञा दिले. ते एक तरवार आणून दिले.. राजा त्यांना म्हणाला. “ह्या जिवंत बाळाला मी दोन भाग करतो अर्धे तिला देतो आणि अर्धे तुला देतो.” तेव्ह जीवंत बाळाची खरी आई फार दुखीत होवून, राजाला विनंती केली कि,” महाराज तो बाळ तिलाच द्या. बाळाला मारू



नका. पण दुसरे म्हणाली कि “तो बाळ मलाही नको आणि तिलाही नको त्याचा अर्धा भाग काराच. त्या क्षणीच राजाने अशी आज्ञा दिले कि बाळाला मारू नका. बाळ जिवंत राहण्याचां आग्रह धरणाऱ्या स्त्रीला तो द्या, तीच त्याची खरी आई आहे”. इस्राएलाचे सर्व जण हा निर्णय ऐकून न्याय निवडा करण्यासाठी ह्या राजामध्ये दैवी ज्ञान आहे हे समजून त्याचे भय धरणारे झाले. (1 राजे 3:16-28)

देवाने सर्व प्राण्यांना शरीर आणि प्राण देवून निर्माण केले आहे. पण मानवाला आत्मा, शरीर आणि प्राण असे तीन गोष्टीनी बनविले आहे. आत्म्याला ज्ञान असते. ज्ञाना विरहित माणूस प्राण्यासामान होय. त्याला कितीही संपत्ती असो, सौंदर्य असो सामर्थ्य असो, तो समाजामध्ये कनिष्ठ दर्जाचा असतो. पण आपल्याजवळ काहीही नसून ज्ञान मात्र असेल तर तो वरिष्ठ स्थानाला चढविला जातो. आणि इतराना आपल्या अधीन ठेवतो. ज्ञानी लोक आकाशामध्ये ताऱ्याप्रमाणे चमकतील: ते अनेकांना नीतिमान बनवितील. म्हणून ज्ञान जीवनामध्ये फार श्रेष्ठ आहे. त्याच्या समान दुसरे काही नाहीच.

आम्ही ह्या लोकांमध्ये बुद्धी विश्व विद्यालयामधून किवा ‘देशोदेशी प्रवास करून किवा शब्दकोश वाचून’ व इतर अनुभवातून सुद्धा मिळवू शकतो. पण दैवी ज्ञान ह्या जगातून प्राप्त करू शकत नाही, कारण “जगीक ज्ञान देवासमोर वेढेपणा आहे“ दैवी ज्ञान आत्म्याच्या संबंधी असते. आणि आत्म्याचा मालक तर परमेश्वर असतो. त्याच्यापासून मात्र तो मिळवू शकतो. ह्याबद्दल पवित्र शास्त्र बोलते कि, देवाचे भय हे ज्ञानाचा प्रारंभ होय. “त्याचे निर्बंध पाळणारे पूर्ण ज्ञानी बनतात.” “देवाचे भय म्हणजे ‘जप करणे, तपस्या करणे, पूजा अर्चा करणे’ असली धार्मिक कार्य करणे नव्हे, तर ते पापाचा द्वेष करण्यामध्ये आहे. म्हणजे – गर्व, अहंकार, दुष्ट मार्ग, कपटी भाषण, वगैरे ह्यांचा द्वेष करणे आहे.”

म्हणून देवाच्या वचनांना स्वीकार करून त्याच्या नियमाना, खास संपत्ती प्रमाणे सांभाळावे. आपले कान ज्ञानाकडे आणि हृदयाला ज्ञानाकडे फिरवा. बुद्धीसाठी धावा करा आणि विवेकासाठी आरोळी मारा. त्याला रुप्यासारखे सांभाळावे. आता तुम्ही दैवी ज्ञानाला प्राप्त करून घावे. देवच ज्ञान प्रदान करतो. त्याच्या मुखातून विवेक बाहेर पडतात. तो सरळ लोकांना सुज्ञान देतो. ज्ञान तुमच्या

हृदयामध्ये प्रवेश करते, समंजसपणाने आत्म्याला सुंदरता येते. बुद्धी तुमचे सरक्षण करो. विवेक तुम्हाला संभाळते. ह्यामुळे तुम्ही दुष्ट मार्गापासून, वाईट बाई पासून चुकविले जाता. विवेक तुम्हाला व्यभिचारी स्त्रीपासून, म्हणजे गोड बोलणाऱ्या परस्त्रीपासून वाचविते. तिचे घर म्हणजे अधोलोकाला जाणारा मार्ग. तिचे सर्व मार्ग अधोलोकांत उतरतात. तिथून कोणी माघारी येत नाहीत, त्यांना जीवनाचा मार्ग, मुक्तीचा मार्ग मिळणारच नाही. चांगल्या लोकांचा मार्ग चांगले करण्यासाठी विवेक प्रेरणा देते, आणि नितीमानांच्या मार्गाने चालण्यासाठी मदत करते.

जसे धन तसे ज्ञान हा आधार असतो. ज्ञान विशेषकरून त्याला मिळवाणाऱ्याना तो मुक्तीचा मार्ग आहे. (उपदेशक 7:12) ज्ञान संपादन कर, विवेक मिळव, ज्ञानाला तू सोडला नाही तर ते तुझे रक्षण करेल. तुझी सर्व संपत्ती देवून का होईना ज्ञानाला मिळव. ज्ञान हे श्रेष्ठ आहे. तिचा तुम्ही शोध केला तर ती तुम्हालां उंच स्थानाला अणील. तिला आलिंगन दिला तर ती तुम्हाला गौरव मिळवून देईल. ती तुमच्या डोक्याला सुदर किरीट घालून, फुलांच्या माळांनी सजवेल. सोने आहे, रत्नाच्या खाणी आहेत. पण ज्ञानाचे ओठच सुंदर दागिने होत. एक ज्ञानी माणूस असे संगतो कि "देवा तुझे शास्त्र मला किती प्रिय आहे, दिवसभर तेच माझा ज्ञान विषय आहे. तुझ्या निर्बंधामुळे मी माझ्या वैऱ्यापेक्षा अधिक सुज्ञ आहे. तुझे वचन माझे ध्यान विषय असल्याने मी माझ्या शिक्षकांपेक्षा अधिक समंजस आहे. तुझ्या नियमांचे पालन केल्याने मी वयस्कर माणसांपेक्षा अधिक अनुभवी आहे." (स्तोत्र संहिता 119: 97-100)

## नवीन संशोधने

मानवतेची भूक गरिबी मिटवण्यासाठी, आजार बरे करून जगणे वाढवून देण्यासाठी, संरक्षण/ प्रवास / संवर्धन अश्या गोष्टीपासून जीवनाला प्रगती पथावर आणण्यासाठी, गरजेचे असे हजारो संशोधने करून, जगाच्या स्मरणामध्ये चिरकाल राहाणारे बहुतेक विज्ञांनी लोक देवाचे भय बाळगणारे आणि पवित्र बायबल हा ग्रंथ मान्य करून त्याचे अनुसरण करणारे होते. त्यांच्यातील काहींचे प्रमुख संशोधने खालील प्रमाणे आहेत.



| | INVENTIONS | INVENTOR | YEAR | COUNTRY |
|---|---|---|---|---|
| 1 | Electric Iron | H.W. Seeley | 1882 | U.S.A |
| 2 | Electric Motor | Moritz Jacobi | 1834 | Russia |
| 3 | Evolution, theory of | Charles Darwin | 1858 | England |
| 4 | Film sound | Dr. Le de Forest | 1923 | U.S.A |
| 5 | Glider | Sir George Calyey | 1853 | England |
| 6 | Insulin | Sir Frederick Banting | 1923 | Canada |
| 7 | Safety Match | J.E. Lundstrom | 1855 | Sweden |
| 8 | Motor car, Petrol | Karl Benz | 1885 | Germany |
| 9 | Radium | Marie & Pierre Curie | 1898 | France |
| 10 | Rubber (vulcanized) | Charles Goodyear | 1841 | U.S.A |
| 11 | Safety Lamp | Sir Humphry Davy | 1816 | England |
| 12 | Telescope | Hans Lippershey | 1608 | Netherlands |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | Television | John Logic Baird | 1926 | Scotland |
| 14 | Thermometer | Galileo | 1593 | Italy |
| 15 | Valve. Radio | Sir J.A Fleming | 1904 | Britain |
| 16 | Printing Press | Johannes Gutenberg | 1440 | Germany |
| 17 | Pocket Watch | Peter Henlein | 1510 | Germany |
| 18 | Microscope | Zacharis Janssen | 1590 | Netherlands |
| 19 | Logarithms, Napier Bones & decimal point | John Napier | 1590s | Scotland |
| 20 | Automatic Calculator | Wilhelm Schickard | 1623 | Germany |
| 21 | Adding Machine | Blaise Pascal | 1642 | France |
| 22 | Barometer | Evangelista Torricelli | 1643 | Italy |
| 23 | Air Pump | Otto Von Guericke | 1650 | Germany |
| 24 | Bacteria | Antonie Van Leeuwenhoek | 1665 | Netherlands |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 25 | Pendulum Clock | Christian Huygens | 1657 | Netherlands |
| 26 | Gravity & Reflecting telescope | Isaac Newton | 1668 | England |
| 27 | Clarinet | Johann Christoph Denner | 1690 | Germany |
| 28 | Steam Engine | Thomas Savery | 1698 | UK |
| 29 | Piano | Bartolomeo Cristofori | 1700 | Italy |

https://data-flair.training/blogs/important-inventions-and-discoveries/

वरील अनेक विज्ञांन्यापैकी बहुतेक लोक यहुदी आहेत. हे लोक देवाने निवडलेले लोक होते. प्रभू येशू सुद्धा ह्याच समाजामध्ये जन्मले. यहुद्यांना देवाने विशेष ज्ञान दिले आहेत. हा समाज जगात 0.99% एवढेच असून देखील ह्यांनीच जगाला उपयुक्त असे संशोधन करून दिले आहेत. आतापर्यंतचे 210 नोबेल पारितोषक ह्यांनीच घेतले आहेत.

म्हणून तुमच्यापैकी जर कोणी ज्ञानाने उणे असेल तर त्याने देवाकडे मागावे, कारण तो त्याना ते देईल, देव कधी पक्षपात करीत नाही तर मागणार्यां सर्वांना तो उदारपणे देणारा आहे. जराही संशय न धरिता विश्वासाने मागावे. संशय धरणारा वार्याने वाहवून नेलेल्या समुद्राच्या लाटेसारखा तो असतो. त्याने देवापासून त्याला काही मिळेल अशी आशा धरू नये.

**देवा आपणावर दया दाखवून त्याच्या सर्व ज्ञानाने तुम्हाला भरावे आणि तुम्हाला मोक्ष प्राप्ती व्हावी अशी आम्ही प्रार्थना करितो.**

~*~*~*~*~*~